मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.
**दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स**
भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२,
८५९१६६२६१६,९८६७३०८०६३

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर | मुंबई, मंगळवार, १३ ऑगस्ट २०२४ | वर्ष- २९ | अंक - ५४ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये



युक्रेनचे सैन्य रशियाच्या आत 30 km घुसले
पान 8

## म ह त्वा चे

### मुन्नव्वर फारुकीने मागितली कोकणी माणसाची माफी

**मुंबई :** स्टँडअप कॉमेडियन मुनव्वर फारुकी पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. स्टॅन्ड अप कॉमेडी कार्यक्रमात केलेल्या एका वक्तव्याने त्याच्या अडचणी वाढल्या आहेत. मुन्नावर फारुकीने स्टँडअप दरम्यान महाराष्ट्रातील कोकणात राहणाऱ्या लोकांचे वर्णन करण्यासाठी वापरलेल्या भाषेवरून हा वाद निर्माण झाला आहे. मुन्नावरचा व्हिडीओ व्हायरल होताच लोकांमध्येही संतापाची लाट उसळली आहे. कोकणी लोकांबाबत अपशब्द वापरल्याने मनसे, शिवसेना आणि भाजप नेत्यांनी मुन्नावर फारुखीला इशारा दिला. त्यानंतर आता मुन्नावरने याबाबत माफी मागितली आहे. मुन्नावर फारुकीच्या मुंबईतल्या एका स्टॅन्ड अप कॉमेडी शोमध्ये हा सगळा प्रकार घडला होता.

### सातारा-लोणंद रस्त्यावर भीषण अपघातात दोन ठार

**सातारा:** सातारा-लोणंद रस्त्यावर अंबवडे सं. वाघोली (ता. कोरेगाव) गावानजीक सोमवारी दोन ट्रकची समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात दोघे चालक ठार झाले. यातील एका ट्रकने अपघातानंतर पेट घेतल्याने त्याच्या चालकाचा ट्रकमध्ये अडकून मृत्यू झाला. याशिवाय अन्य दोघे यामध्ये जखमी झाले आहेत. अल्ताफ मन्सुरी, (वय-२०, रा. भगोरा, ता. जिरापूर, जि. राजगड, मध्यप्रदेश) आणि महेश दयानंद घुगे (वय ३७, हल्ली रा. गोकुळ शिरगाव, कोल्हापूर) असे मृत चालकांचे नाव आहे.

### पाकिस्तानचे माजी ISI प्रमुख लष्कराच्या ताब्यात

**इस्लामाबाद :** पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयचे माजी प्रमुख लेफ्टनंट जनरल फैज हमीद यांना लष्कराने ताब्यात घेतले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर फैज हमीदला ताब्यात घेण्यात आले आहे. सध्या लष्कराने त्यांचे कोर्ट मार्शल सुरू केले आहे. फैज हमीद हे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या जवळचे मानले जातात. पाकिस्तानात आयएसआयच्या माजी प्रमुखाला ताब्यात घेण्याची ही पहिलीच वेळ आहे. टॉप सिटी हाऊसिंग घोटाळा प्रकरणी फैज हमीदविरोधात तक्रार दाखल करण्यात आली होती. त्याला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. गेल्या वर्षी 14 नोव्हेंबर रोजी पाकिस्तानी सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटले होते की फैज हमीद यांच्यावरील आरोपांकडे दुर्लक्ष केले जाऊ शकत नाही. हा आरोप अतिशय गंभीर आहे. फैज दोषी सिद्ध झाल्यास देशातील संस्थांच्या प्रतिष्ठेला हानी पोहोचेल.

# आम्हाला मते द्या, अन्यथा तुमच्या खात्यातून पैसा परत काढून घेणार ...

## 'लाडकी बहीण योजने'वरुन आमदार रवी राणा यांचे धक्कादायक वक्तव्य

प्रतिनिधी
**अमरावती**



आमचे सरकार आल्यावर लाडकी बहीण योजनेचे दीड हजार रुपये आम्ही दुप्पट म्हणजे 3000 रुपये करू. मात्र त्यासाठी मला तुमचा आशीर्वाद हवा आहे. मात्र, ज्यांनी मला आशीर्वाद दिला नाही, अशांच्या खात्यातून दीड हजार रुपये वापस घेऊ, असे धक्कादायक वक्तव्य आमदार रवी राणा यांनी केले आहे.

अमरावतीमध्ये आयोजित मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या प्रमाणपत्र वितरण सोहळ्यात ते बोलत होते. ज्यांचे खाल्ले त्यांना जागलेच पाहिजे, सरकार देत राहते मात्र, सरकारलाही आशीर्वाद दिला पाहिजे, असे मत रवी राणा यांनी व्यक्त केले आहे.राणा यांच्या या वक्तव्यावर केवळ विरोधकच नव्हे तर सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी संताप व्यक्त केला आहे.

रवी राणा यांच्या या वक्त्यामुळे राज्यात आता चांगलीच चर्चा रंगली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सरकारच्या वतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर करण्यात आली. तेव्हापासूनच या योजनेची चर्चा राज्यभर सुरू आहे. मात्र, आता याच योजनेवरून वाद होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. रवी राणा यांच्या वक्तव्यावर विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी जोरदार पलटवार केला आहे.

### सरकारी पैसा हा रवी राणा, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचा आहे काय?- वडेट्टीवार



*मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना सरकारी पैशातून आहे. निवडणुकीच्या तोंडावर मते मिळविण्यासाठी बहिणींना फसविण्यासाठी ही योजना सरकारने आणली आहे. आमदार रवी राणा जे बोलले ते मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या मनातले बोलले आहेत. आमच्या बहिणी दीड हजार रुपयाला मत विकतील का? सरकारी पैसा हा रवी राणा, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचा आहे काय? असा संतप्त सवाल करत राज्यातील भगिनींचा अपमान करणारी सत्ताधाऱ्यांची भाषा असल्याने सरकारने बहिणींची माफी मागावी अशा शब्दात विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी रवी राणा यांची खरडपट्टी काढली आहे. माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनीही राणा यांच्या या वक्तव्याचा समाचार घेत, सरकारच्या मनातलेच राणा बोलत आहेत, असा हल्लाबोल केला आहे.*

### मी योजनेचे पैसे वाढावा असे म्हटलेय, राणांचा यूटर्न

*विरोधकांनी नको त्या गोष्टीचा बाऊ करू नये. पैसे परत घेण्याचं तर सोडा, मी माझ्या भाषणात सरकारने लाडकी बहीण योजनेचे पैसे वाढवावे अशी मागणी केली आहे. तसेच आशा सेविकेचे मानधन वाढवावे, असे मी म्हटले आहे. मुळात विरोधकांनी चांगल्या गोष्टी शिकल्या पाहिजे, कोणत्याही विधानाचा राजकीय फायदा घेऊ नये, भाऊ हा नेहमी बहिणीला देत असतो, तिच्याकडून काही घेत नाही, हे विरोधकांनी लक्षात ठेवले पाहिजे, अशी प्रतिक्रिया रवी राणा यांच्यावरील टीकेनंतर दिली आहे.*

# काँग्रेसला शेअर बाजार संपवायचा आहे - भाजप

प्रतिनिधी
**नवी दिल्ली**



देशातील जनतेने काँग्रेसला नाकारले आहे, असे भाजप खासदार रविशंकर प्रसाद हिंडेनबर्ग अहवाल आणि काँग्रेसच्या आरोपांवर म्हणाले. त्यामुळे त्यांना टूलकिट गँगसोबत भारतीय शेअर बाजार उद्ध्वस्त करायचा आहे.

रविशंकर यांनी सोमवारी (12 ऑगस्ट) काँग्रेसवर हे आरोप केले. ते म्हणाले- हिंडेनबर्गचे मुख्य गुंतवणूकदार अमेरिकन उद्योगपती जॉर्ज सोरोस हे भारतविरोधी आहेत. राहुल गांधी त्यांचे एजंट आहेत. पंतप्रधान मोदींचा तिरस्कार करतानाच ते देशाचा द्वेष करू लागले आहेत.

भाजप खासदार सुधांशू त्रिवेदी म्हणाले की, गेल्या काही वर्षांत असे दिसून आले आहे की संसदेचे अधिवेशन सुरू असताना अशा वेळी असे आरोप होतात. पीएम, हिंडेनबर्ग रिपोर्टवरील माहितीपट ही उदाहरणे आहेत. विरोधकांचा परदेशाशी संबंध असल्याचे स्पष्ट झाले आहे.

किंबहुना, हिंडेनबर्गच्या अहवालात सेबीच्या अध्यक्षांवर आरोप झाल्यानंतर, गुंतवणूकदारांचे नुकसान झाल्यास त्याला जबाबदार कोण, असा सवाल राहुल गांधी यांनी केला होता. जेपीसी चौकशीला पंतप्रधान का घाबरतात हे आता पूर्णपणे स्पष्ट झाले आहे. बाजार नियामक सेबी आणि अदानी समूहाने अमेरिकन शॉर्ट सेलर हिंडेनबर्गचे आरोप निराधार असल्याचे म्हटले आहे. पान 8 वर

### भारताच्या शेअर बाजारात फुगवटा आणला गेला आहे

*भारताच्या शेअर बाजारात फुगवटा आणला गेला आहे, असा आरोप लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे केंद्र सरकारवर करतात. मात्र मागच्या पाच महिन्यात त्यांच्या स्वतःच्या शेअर्समध्ये चांगलीच वाढ झाल्याचे समोर आले आहे. आयएनएस वृत्तसंस्थेने याबाबतचे वृत्त दिले आहे. राहुल गांधी यांनी लोकसभा निवडणुकीदरम्यान त्यांनी केलेल्या गुंतवणुकीसंदर्भात शपथपत्रात माहिती दिली होती. यावेळी त्यांनी कोणकोणत्या शेअर्समध्ये गुंतवणूक केली, याचीही माहिती दिली होती. या शेअर्सच्या दरात मागच्या पाच महिन्यात घसघशीत वाढ झाल्याचे समोर आले आहे.*



*राहुल गांधी यांच्या शेअर बाजार पोर्टफोलियोची किंमत ४.३३ कोटींवरून (१५ मार्च २०२४) आता १२ ऑगस्ट २०२४ रोजी ४.८० कोटींवर पोहोचल्याचे आयएनएसच्या वृत्ताद्वारे समोर आले आहे. राहुल गांधी यांनी लोकसभा निवडणुकीच्या शपथपत्रात दिलेल्या माहितीनुसार त्यांच्याकडे एशियन पेंट्स, बजाज फायनान्स, दीपक नायट्रेट, डिव्हिस लॅब्स, जीएमएम फॉडलर, हिंदुस्तान लिव्हर, इन्फोसिस, आयटीसी, टिसीएस, टायटन, ट्यूब इनव्हेस्टमेंट ऑफ इंडिया अशा काही कंपन्यांचे शेअर्स राहुल गांधी यांच्या पोर्टफोलियोमध्ये आहेत.*

# 700 AI कॅमेरे, 10 हजारांहून अधिक पोलिस, शार्पशूटर

## स्वातंत्र्यदिनी राजधानीत अशी असेल सुरक्षा

प्रतिनिधी
**नवी दिल्ली**

दिल्लीत 15 ऑगस्टच्या तयारीला अंतिम स्वरूप देण्यात असून त्यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. दिल्ली पोलिसांनी या कार्यक्रमासाठी 3,000 वाहतूक पोलिस अधिकारी, 10,000 पोलिस कर्मचारी आणि 700 कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित चेहरा ओळखणारे कॅमेरे तैनात करून सुरक्षा वाढवली आहे.

**सुरक्षेबाबत विशेष व्यवस्था**

- आयजीआय एअर पोर्ट, रेल्वे स्थानके, बस स्टँड, मॉल्स आणि बाजारपेठांसह विविध ठिकाणी अतिरिक्त पोलिस दल आणि निमलष्करी दल तैनात.
- वाहतूक नियंत्रणासाठी तीन हजारांहून अधिक वाहतूक पोलिस तैनात करण्यात येणार आहेत.
- राष्ट्रीय राजधानीतील प्रमुख जंक्शनवर आणि लाल किल्ल्याला सीमेला जोडणाऱ्या रस्त्यांवरही वाहतूक पोलिस तैनात केले जातील.
- लाल किल्ल्यावर अनेक पातळ्यांवर सुरक्षा व्यवस्था असणार आहे. 700 AI-आधारित फेशियल रिकग्निशन सीसीटीव्ही कॅमेरे किल्ल्याच्या परिसरात बसवले जातील.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाला संबोधित करतील तेव्हा या मुघलकालीन किल्ल्यावर 10,000 हून अधिक सुरक्षा कर्मचारी तैनात केले जातील.
- लाल किल्ल्यावरील कार्यक्रमाला हजेरी लावण्यासाठी येणाऱ्या लोकांची ओळख पडताळून पाहण्यासाठी पोलिस स्मार्टफोन आधारित ॲप्लिकेशन देखील वापरणार आहेत.



# घाबरलेल्या शिंदे सरकारने तिजोरीचा दरवाजाच काढला!

प्रतिनिधी
**सोलापूर**

लोकसभा निवडणुकीत फटका बसल्यानंतर विधानसभेसाठी महायुती सरकारने अनेक योजनांचा पाऊस पाडला. मात्र यावेळची निवडणूक वेगळी आहे. सरकार घाबरलेले आहे.

ज्यांनी 9 अर्थसंकल्प मांडले त्यांनी 10 व्या अर्थसंकल्पावेळी तिजोरीचे दारच काढून टाकले, असा टोला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी नाव न घेता उपमुख्यमंत्री अजित पवारांना लगावल.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शिवस्वराज्य यात्रा आज सोलापूर जिल्ह्यातील माळशिरसमध्ये होती. त्यावेळी जयंत पाटील यांनी अजित पवारांसह राज्य सरकारला लक्ष्य केले. ते म्हणाले, लोकसभेनंतर राज्य सरकार घाबरले आहे. यातूनच वाटेल त्या घोषणा करून टाकल्या आहेत. अनेक घोषणा करून अर्थमंत्र्यांनी तिजोरीचा दरवाजा काढून ठेवला आहे. या घोषणा केल्यानंतरही त्यांना विधानसभा निवडणुकीबाबत आत्मविश्वास वाटत नाही. त्यातून स्वतःची जाहिरात करण्यासाठी 270 कोटी रूपये राखून ठेवले आहेत, असा निशाणाही पाटील यांनी अजितदादांवर साधला.

आता वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर, चौथ्या पानावर तिघांचेही फोटो असतात. टीव्हीवर सासू-सुनांच्या भांडण्याच्या मालिकेतही मध्येच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे येतात. मोबाईलवर जाहिराती येतील. गावागावत प्रचंड बॅनर लागतील. जाहीरातीसाठी 280 कोटी आता आहेत, त्यात आणखी 100 कोटी वाढतील. एवढे करूनही जमेना म्हटल्यावर त्यांनी योजना दूत योजना काढली. त्यासाठी 300 कोटी वेगळे राखून ठेवले आहेत. विधानसभेत निरंकुश सत्ता आणण्यासाठी त्यांचे सर्व काही प्रयत्न सुरू केले आहेत, याकडेही जयंत पाटील यांनी लक्ष वेधले.

निवडणुका आल्यानंतर सरकार विविध मार्गातून पैसे वाटण्याचे काम करत आहे. राज्यात सध्या भ्रष्टाचार बोकाळला आहे. अनेक प्रकरणे पुढे येणार आहेत. जालनातील एका रस्त्याचे 11 हजार कोटीचे टेंडर 15 हजार कोटींना दिले. विरारहून आलीबाग रस्त्याचे टेंडर 20 हजार कोटींचे टेंडर 26 हजार कोटींना जाण्याची माहिती आहे.

# पक्ष फोडण्याची स्पर्धा घेतली, तर शरद पवारांना सुवर्णपदक मिळेल

**देवेंद्र फडणवीसांची खोचक टीका**

प्रतिनिधी
**मुंबई**



देशात जर पक्ष फोडण्याची स्पर्धा घेतली, तर त्याचे सुवर्णपदक शरद पवार यांना मिळेल, अशी खोचक टीका राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. तसेच राज्यात महाविकास आघाडीबाबत कुठेही सहानुभूती नसून काही लोकांद्वारे केवळ सहानुभूतीचा डंका वाजवला जातो आहे, असे ते म्हणाले.

देवेंद्र फडणवीस यांनी एका खाजगी वृत्तवाहिनीला मुलाखत दिली. यावेळी त्यांनी विविध विषयांवर त्यांची भूमिका स्पष्ट केली. यावेळी त्यांना शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन पक्ष फुटण्याबाबतही विचारण्यात आलं. यासंदर्भात बोलताना त्यांनी शरद पवार यांच्यावर खोचक शब्दांत टीका केली.

“मी पुन्हा आलो, पण यावेळी दोन पक्ष फोडून आलो, असं मी एकदाच बोललो होतो. आणि तेही गंमतीने बोललो होते. खरं तर अशाप्रकारे कोणीही कोणाचे पक्ष फोडू शकत नाही. दोन्ही पक्षा त्या त्या पक्षांतील नेत्यांमुळे फुटले. एकनाथ शिंदे यांना शिवसेनेत आणि अजित पवार यांना राष्ट्रवादीत त्यांचे भविष्य दिसत नसल्याने ते पक्षातून बाहेर पडले”, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

पुढे बोलताना त्यांनी शरद पवार यांनाही लक्ष्य केलं. “मुळात शरद पवार यांनी आतापर्यंत सगळ्यात जास्त पक्ष फोडले. पक्ष फोडण्याचा विक्रम त्यांच्याच नावावर आहे. देशामध्ये पक्ष फोडण्याची स्पर्धा घेतली, तर शरद पवार यांना सुवर्णपदक मिळेल”, असा टोला त्यांनी लगावला.
पान 8 वर

## ठाकरेंच्या पदरी निराशा

# पक्ष अन् चिन्हाबाबतची सुनावणी पुढे ढकलली

**नवी दिल्ली**

एकनाथ शिंदे यांच्यासह 40 आमदारांनी बंड केल्यानंतर महाविकास आघाडी सरकार कोसळलं होतं. त्यानंतर शिंदे यांच्या गटाला केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण हे चिन्हही बहाल केलं. निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात ठाकरे गटाकडून दाखल करण्यात आली आहे. याच याचिकेवर 14 ऑगस्टला सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार होती. पण आता ही सुनावणी पुढे ढकलली असून आता ती 17 सप्टेंबरला होणार आहे.त्यामुळे शिवसेना पक्ष आणि चिन्हावरील सुनावणीला तारीख पे तारीख मिळत असल्याचे बोलले जात आहेत.


भाजपसोबत सत्ता स्थापन केलेल्या एकनाथ शिंदे यांच्या गटाने आपल्याकडे असलेल्या आमदार आणि खासदारांच्या संख्याबळावर थेट शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हावरच दावा ठोकला होता. यावर निकाल देताना निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण हे चिन्ह शिंदे गटाला दिलं होतं. तर ठाकरे गटाला उद्धव बाळासाहेब ठाकरे हे नाव आणि मशाल हे चिन्ह दिलं होतं. शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणी गेले कित्येक महिने सुप्रीम कोर्टात सुनावणी झालेली नाही. त्यामुळे 14 ऑगस्टला होणाऱ्या सुनावणीकडे उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे लक्ष लागले होते. मात्र, आता न्यायालयाने ही सुनावणी जवळपास पुन्हा महिनाभर पुढे ढकलली आहे. ती आता 17 सप्टेंबरला होण्याची शक्यता आहे.

# मायमाऊलींची सेवा करताना मरण आलं तरी मला अभिमान



**जळगाव -** जर बहिणींच्या कल्याणासाठी काम करताना माझं बरंवाईट झालं तरी मला पर्वा नाही. गेल्या ३३ वर्षापासून मी जनसेवेला समर्पित केले आहे. मी ते करत राहीन. जर हेच माझ्या नशिबात असेल, माझं भाग्य असेल तर माझा जीव गेला तरी या महानभूमीतील लोकांच्या मायमाऊलीच्या सेवेत काम करताना मरण पत्करावं लागलं तरी मला अभिमान वाटेल असं विधान उपमुख्यमंत्री अजित पवारांनी केले आहे.

जळगाव येथे जनसन्मान यात्रेच्या भाषणात ते बोलत होते. अजित पवार म्हणाले की, काल मी नाशिकला आलो तेव्हा गुप्तचर विभागाने माझ्या जीवाला वाढलेल्या धोक्याबाबत चिंता व्यक्त केली. या बातम्याही पसरल्या. मलाही काही हिंट त्यांनी दिली. मोठ्या संख्येने लोक उपस्थित राहणार आहेत तिथे जाताना काळजी घ्या अशा सूचना मला करण्यात आल्यात असं त्यांनी सांगितले.



# मराठवाड्यातील दुष्काळ दूर करण्यासाठी शासन कटिबद्ध - मुख्यमंत्री

## हिंगोलीच्या कावड यात्रेस मुख्यमंत्र्याची भेट

प्रतिनिधी
**हिंगोली**

मराठवाड्यातील दुष्काळ दूर करण्यासाठी राज्यशासन कटीबद्ध आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारच्या मदतीने मराठवाड्यातील नदीजोड प्रकल्प राज्य शासन पूर्णत्वास नेणार असून एकूणच मराठवाड्याला समृद्ध करणारच असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

हिंगोली येथील अग्रसेन चौक येथे कयाधू अमृतधारा महादेव मंदिर आणि आमदार संतोष बांगर यांच्या पुढाकारातून कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. कार्यक्रमास आमदार संतोष बांगर, आमदार बालाजी कल्याणकर, हेमंत पाटील यांची उपस्थिती होती.



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना, हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजना, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, आनंदाचा शिधा, मुलींसाठी 100 टक्के मोफत उच्च शिक्षण आदी योजनांचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन शिंदे यांनी उपस्थितांना केले. कळमनुरी येथे आमदार संतोष बांगर यांनी दान स्वरुपात चार एकर जमीन दिली आहे. त्याठिकाणी विपश्यना केंद्र सुरु करण्यात येणार आहे. वसमत येथील बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्रास 800 कोटी रुपये निधी मंजूर आहे. तर राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना यासह सर्व योजनांसाठीही भरीव निधी भरीव तरतूद केल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. यासह अन्य विकासात्मक कार्यासाठी आमदार बांगर यांचे कौतुकही शिंदे यांनी केले.

अद्याप मराठवाड्यात पावसाने चांगली हजेरी लावली आहे. परंतु उर्वरीत कालावधीतही मुबलक पाऊस पडावा, शेतकरी समृद्ध व्हावा, यासाठी औंढा नागनाथ येथील नागनाथाला साकडे घातल्याचेही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. कार्यक्रमस्थळी मुख्यमंत्री शिंदे यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

आमदार बांगर यांच्या पुढाकारातून मागील दहा वर्षांपासून कळमनुरीतील चिंचाळेश्वर महादेव संस्थान येथून कावड यात्रा काढण्यात येते. कळमनुरी येथून काढलेली ही कावड यात्रा हिंगोलीतील कयाधू नदी तिरावरील अमृतेश्वर महादेव मंदिरापर्यंत काढण्यात येते. या यात्रेस कावडधारींसह भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता.

## जव्हार तहसील कार्यालया अंतर्गत दिव्यांग कल्याण उपक्रम

**जव्हार :** पालघर जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांचे मार्गदर्शनाखाली महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या व राबविण्यात येणाऱ्या विविध योजना याबाबत नागरिकांना अधिक माहिती प्राप्त होऊन योग्य लाभ प्राप्त व्हावा तसेच नागरिकांमध्ये विश्वास वृद्धिंगत व्हावा यासाठी विशेष मोहीम व लोकाभमुख उपक्रम हा १ ऑगस्ट महसूल दिनापासून महसूल पंधरवडा म्हणून साजरा करण्यात येत आहे. या महसूल पंधरवाडा अंतर्गत तहसील कार्यालय जव्हार येथे "एक हात मदतीचा दिव्यांगाच्या कल्याणाचा" हा उपक्रम सोमवारी सकाळी राबविण्यात आला. दरम्यान, या उपक्रमात संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत एकूण प्राप्त सात दिव्यांग लाभार्थ्यांचे प्रस्ताव मंजूर करून मंजुरी बाबतचे प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. राष्ट्रीय कुटुंब लाभार्थ साहाय्य योजना अंतर्गत एकूण चौदा लाभार्थ्यांचे प्रस्ताव मंजूर करून त्यांनाही मंजुरी प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. शिवाय उपस्थित सर्वांना हर घर तिरंगा बाबत माहिती देऊन जनजागृती करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी तहसीलदार जव्हार लता धोत्रे , जव्हार, संजय गांधी नायब तहसीलदार वसंत सांगळे यांनी संजय गांधी योजनेबाबतची माहिती दिली.जव्हार पंचायत समितीचे सहा गट विकास अधिकारी, दोंदे,संजय गांधी अ.का. शामराव आहेर, इंदिरा गांधी , अ. का. योगेश माळी उपस्थित होते.



## थोडक्यात

### नवयुवकांनी मतदार यादीत नाव नोंदणी करावी - जिल्हाधिकारी

**मुंबई:** आगामी निवडणुकांमध्ये कोणताही मतदार मतदानापासून वंचित राहू नये, असे निर्देश भारत निवडणूक आयोगाने दिलेले आहेत. मुंबई शहर जिल्ह्यात मतदार यादी विशेष संक्षिप्त पुन:रिक्षण कार्यक्रम सुरू आहे १ जुलै २०२४ रोजी ज्या व्यक्तीचे वय १८ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त असेल अशा नवयुवकांनी मतदार यादीत नाव नोंदणी करावे, असे आवाहन मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव यांनी केले आहे. दिव्यांग व्यक्तींकरिता देखील नोंदणीची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. नवीन मतदार होऊ इच्छिणाऱ्या दिव्यांग व्यक्तींनी १ जुलै २०२४ रोजी १८ वर्ष पूर्ण केली असतील, तर त्यांनी अर्ज क्रमांक ६ भरावा. ज्या दिव्यांग व्यक्तींकडे यापूर्वी मतदार ओळखपत्र उपलब्ध आहे. परंतु दिव्यांग मतदार म्हणून नोंद केली नसेल, अशा व्यक्तींनी अर्ज क्रमांक ८ भरून दिव्यांग मतदार यादीत नाव नोंद करून घ्यावी, त्यामुळे आगामी निवडणुकांमध्ये मतदानादिवशी देण्यात येणाऱ्या सुविधांचा लाभ जास्तीत जास्त दिव्यांग मतदारांना देता येईल, असे जिल्हाधिकारी यादव यांनी यावेळी सांगितले. हे अर्ज आपल्या घराजवळील मतदार नोंदणी अधिकारी, विधानसभा निवडणूक कार्यालयात उपलब्ध आहेत. त्याच कार्यालयात अर्ज भरून जमा करता येतील. निवडणूक आयोगाच्या www. voters. eci.gov.in या वेबसाईट अर्ज करून नवीन मतदार नोंदणी करू शकतात. ही नोंदणी दिनांक 6 ऑगस्ट २०२४ ते २० ऑगस्ट २०२४ या कालावधीमध्ये सुरु राहणार आहे. मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुन:रिक्षण कार्यक्रमाअंतर्गत प्रामुख्याने मतदार यादीत नावनोंदणी, नावांमधील दुरुस्ती तसेच नाव स्थलांतरित करुन घेवू शकतात. ही सर्व कामे ऑनलाईनसह ऑफलाईन पद्धतीनेही करता येतील.

### विष्णु सावंत यांचे निधन



**मुंबई:** समाजवादी विचाराचे धैर्यशिल कार्यकर्ते विष्णु जयराम सावंत यांचे आज पहाटे 4:25 वाजता राहत्या घरी अल्प आजाराने निधन झाले. ते 77 वर्षाचे होते. नेव्हल डॉक यार्ड येथे नोकरीस असलेल्या विष्णु सावंत यांनी 21वर्षाचा सेवाकाळ पूर्ण करून स्वेच्छा निवृत्ती घेतली. तद्नंतर भांबेड या त्याच्या गावी स्थायीक झाले. भांबेड येथे ऊत्कर्ष मंडळ पवार वाडी या नावाने युवकांचे संघटण बांधुन ग्राम पातळीवर सांस्कृतिक व सामाजिक कार्यास प्रारंभ केला. संस्थेची त्यांनी सरचिटणीस म्हणुन धुरा सांभाळली.लांजा तालुक्यात विविध ऊपक्रम राबविण्यात विष्णु सावंत यांचा ऊत्साह दांडगा होता. त्याच्या पश्चात विवाहित मुलगी अनघा प्रितम नाईक , नातवंडे असा परिवार आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# वसई विधानसभेसाठी बविआचा चेहरा कोण?

## लोकनेत्यांच्या निवृत्तीनंतर राजीव पाटील, प्रविणा ठाकूर या चेहऱ्यांची चर्चा

## मात्र लोकसभेतील पराभवानंतर लोकनेते निवृत्ती मागे घेत खिंड लढवणार?

प्रतिनिधी
■ वसई

वसई विधानसभा मतदारसंघाचे सलग सहा वेळेस आमदार राहीलेले आमदार हितेंद्र ठाकूर यांनी गतवेळेस विजयी झाल्यानंतर राजकीय निवृत्ती घेतल्याचे जाहीर केले होते. मात्र नुकत्याच लोकसभेतील मोठ्या पराभवानंतर ते यंदाच्या विधानसभा निवडणुकीत निवृत्ती मागे घेत पुन्हा खिंड लढवणार का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगताना दिसून येते. याच धर्तीवर जर आमदार हितेंद्र ठाकूर यांनी विधानसभेत परतण्याची इच्छा व्यक्त न केल्यास त्यांच्या जागी वसईची जागा कोण लढवणार? असा सवाल सध्या राजकीय पटलावर तरंगताना दिसत आहे.

दरम्यान, वसईची जागा लढवण्यासाठी तसा खंदा चेहराही बहुजन विकास आघाडीला रणांगणात उतरवावा लागणार आहे. यात सध्या वसई -विरार शहर महानगरपालिकेचे प्रथम महापौर राजीव पाटील व स्वत: हितेंद्र ठाकूर यांच्या पत्नी व माजी महापौर प्रविणा ठाकूर यांच्या नावांना पसंती मिळत आहे. मात्र जर लोकनेते हितेंद्र ठाकूर यांनी राजकारणातील आपली निवृत्तीवर ठाम राहीले तर वसई विधानसभेसाठी नव्या चेहऱ्याला पुढील पाच वर्ष वाट पहावी लागेल.

वसई विधानसभा क्षेत्रात सन 1990 सालापासून बविआचे हितेंद्र ठाकूर हे जिंकुन येत आहेत. सन 2009 साली त्यांच्या वसई विधानसभेला पहिल्यांदा विवेक पंडित यांनी सुरूंग लावला. मात्र त्यावेळेस स्वत: आमदार हितेंद्र ठाकूर हे मैदानात नव्हते, तर त्यांनी माजी महापौर नारायण मानकर यांना निवडणुकीत उभे केले होते. त्या निवडणूकीत नारायण मानकर यांचा पराभव झाला होता. मात्र त्यानंतर कमबॅक करत हितेंद्र ठाकूर यांनी सन 2014 ची विधानसभा लढवली व माजी आमदार विवेक पंडित यांचा पराभव केला. त्यानंतर आमदार हितेंद्र ठाकूर यांनी सन 2019 सालची निवडणूक जिंकल्यानंतर राजकारणातून संन्यास घेत असल्याचे प्रसारमाध्यमांशी बोलताना जाहीर केले होते. मात्र सध्याची राजकीय परिस्थिती पाहता ते वसईच्या मैदानातून निवृत्ती मागे घेतील अशी शक्यता आहे. त्यांच्या वसई विधानसभा मतदारसंघात नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत बविआचे मोठ्या प्रमाणात मताधिक्य घटले आहे. त्यांचा उमेदवार तिसऱ्या क्रमांकावर राहिल्याने यावेळेस वसईचा गड बविआला कठीण मानला जातो.

स्वत: आमदार हितेंद्र ठाकूर हे मैदानात उतरले तरंच बविआचा विजय निश्चित मानला जातो. इतर चेहऱ्याचा येथे टिकाव लागेल अशी परिस्थिती वसईत यावेळेस नसल्याचे लोकसभा निकालावरून दिसून येते. तसेच भाजप व महाविकास आघाडीकडून जोरदार मोर्चेबांधणी वसईत सुरू झाली आहे. त्याच धर्तीवर आमदार हितेंद्र ठाकूर यांना निवृत्ती मागे घेत वसईच्या रणांगणात उतरण्यावाचून दुसरा पर्याय नाही. मात्र त्यानंतरही त्यांनी राजकीय निवृत्तीवर ठाम असल्याचे प्रतिपादन केले तर ते कोणाला संधी देतील, असा प्रश्न आहे. लोकनेते हितेंद्र ठाकूर हे राजीव पाटील किंवा प्रविणा ठाकूर यांच्या नावाचा विचार करू शकतात, अशी चर्चा आहे. तसेच त्यांच्या स्वभावानुसार ते इतरही कोण्या दुसऱ्या निष्ठावान कार्यकर्त्याला वसईच्या रणांगणात उतरविण्याची शक्यता आहे.

# महामार्गाचे होतेय डंपिंग ग्राऊंड!

## मुंबईचा कचरा वसईच्या हद्दीत

### पोलीस, महामार्ग प्रशासन थंड

प्रतिनिधी
■ वसई

मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील वाढती कचरा समस्या लक्षात घेता महामार्गाचे हळुहळू डंपिंग ग्राऊंड होत असल्याचे चित्र आहे. मुंबईचा कचरा सर्रास वसईच्या हद्दीत आणून टाकला जात असताना पोलीस व महामार्ग प्रशासन थंडपणे पाहत बसले असल्याने वाहनचालक व नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर मुंबईतील कचरा, डेंब्रिज आणून खाली केले जात आहे. कधी रस्त्यावर तर कधी महामार्गाला लागून असलेल्या सर्व्हिस रोडवर हा कचरा खाली केला जात असल्याने नागरिकांनी तिव्र नाराजी व्यक्त केली आहे. मध्यंतरी मांडवी व पेल्हार पोलिसांनी त्यांच्या हद्दीतील महामार्गावर कचरा खाली करणाऱ्या काही ट्रक चालकांवर कारवाई करत गुन्हे दाखल केले होते. त्यानंतर मात्र अशा स्वरूपाच्या कारवाईला खिळ बसली आहे. महामार्गावर मोठ्या प्रमाणात मुंबईचा कचरा आणून खाली केला जात असताना नायगाव पोलीस ठाणे, चिंचोटी



महामार्ग पोलीस ठाणे व महामार्ग प्रशासन सुस्त असल्याने त्याचा ताप वाहतुकदारांना व नागरिकांना सोसावा लागत आहे.

महामार्गावर मोठ्या प्रमाणात कचरा खाली केला जात असल्याने त्याचा परिणाम येथील नैसर्गिक पाणी निचऱ्याच्या वाटा बुंजण्यात झाला आहे. त्यामुळे महामार्गावर पाणी साचण्याच्या समस्या वाढीस लागल्या आहेत. याबाबत अनेकदा कागदोपत्री कारवाया होत असल्याने नागरिकांना त्याचा ताप सोसावा लागत आहे. दरम्यान, महामार्गावर मुंबईचा कचरा आणून खाली केला जात असल्याने महामार्गाचे डंपिंग ग्राउंड होत असल्याचे एकंदर चित्र आहे.

## आदिवासी समाजातील वेगवेगळ्या संस्थांचे अंतरसिंह आर्या यांना निवेदन



■ पालघर

१२ ऑगस्ट राष्ट्रीय जनजाती आयोगाचे अध्यक्ष अंतरसिंह आर्या यांचा पालघर दौऱ्यावर असताना ,पालघर जिल्हा नियोजन समिती सभागृहामध्ये आदिवासी समाजातील वेगवेगळया संस्थांचे व संघटनांचे प्रतिनिधी तसेच आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक व सामाजिक समस्यांचे निवारण करण्यासाठी या सभागृहात बैठक घेण्यात आली. गेल्या वर्षी पालघर जिल्ह्यात पेसा मध्ये पात्र उमेदवारांची भरती रखडली होती, त्या संदर्भात जनजाती सुरक्षा मंचाने आंदोलन केले, गेल्या १२ दिवसांपासून नाशिक येथे पेसा १७ संवर्गातील पद भरतीसाठी आंदोलन सुरू आहे. जनजाती सुरक्षा मंचाच्या पुढाकाराने नाशिकच्या आदिवासी आयुक्तांची भेट घेतली असून बैठकीत नाशिक मध्ये १७ संवर्गातील पेसाभरती संदर्भात जे आंदोलन सुरू आहे त्या संदर्भात जनजाती सुरक्षा मंचाच्या वतीने हे निवेदन देण्यात आले.

## विद्यार्थ्यांचा स्वातंत्र्यदिन गणवेशाविना?

प्रतिनिधी
■ मुंबई

स्वातंत्र्यदिनी कडक गणवेशातील विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध रांगा, झेंडावंदनासाठीचे संचलन हे सगळे चित्र यंदाही शाळांमध्ये स्वातंत्र्यदिनी दिसेल. पण, या चित्रातील अविभाज्य भाग असलेला शाळेच्या गणवेशाची अनुपस्थिती यंदा दिसणार आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी मिळणे अपेक्षित असलेला गणवेश अद्यापही सर्व शाळांपर्यंत पोहोचलेला नाही.

दरवर्षी शाळांच्या स्तरावर होणारी विद्यार्थ्यांच्या गणवेशाची खरेदी मोडीत काढून यंदा राज्याच्या पातळीवर एकच गणवेश लागू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. गणवेशाचे कापड पुरवठा करण्याचे कंत्राट पद्माचंद मिलापचंद जैन यांना देण्यात आले आहे.

## ग्रामीण भागात भात लागवड अंतिम टप्प्यात; पावसाच्या हुलकावणीने शेतकरी चिंतेत

प्रतिनिधी
■ वसई

वसईत भात लागवड अंतीम टप्प्यात आली असताना पावसाने मात्र पुन्हा एकदा ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागात पावसाने पाठ फिरवली आहे. त्यामुळे पावसाअभावी अंतीम टप्प्यातील भात लागवड अडचणित आली आहे. पावसाने या महिन्यात दांडी मारल्यास लागवड केलेल्या भातशेतीला पाण्याचा पुरवठा कमी पडून शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. दरम्यान, सध्या पावसाने दडी मारल्याने वातावरण कोरडेठाक पडून धुळीचे साम्राज्य पसरले आहे.

यंदा जुलै व ऑगस्ट महिन्यात पावसाने जून महिन्याची कसर भरून काढत शेतकऱ्यांना दिलासा दिला. जुलै व ऑगस्ट महिन्यात किमान 15 दिवस पाऊस चांगला झाल्याने भातलागवडीला चांगला हंगाम शेतकऱ्यांना प्राप्त झाला. गेल्या आठवड्यापासून वसईच्या शहरी भागातून पाऊस गायब झाला आहे. तर ग्रामीण भागात मात्र मुसळधार पावसाने धुमाकुळ घातला होता. दरम्यान, ग्रमीण भागातूनदेखील पावसाने आता दडी मारली असून शेतकऱ्यांना चिंता भेडसावू लागली आहे. ग्रामीण भागात अद्याप काही शेतकऱ्यांची भातलागवड सुरू असून पावसाने दडी मारल्याने पाण्याअभावी ही लागवड खोळंबण्याची चिन्हे आहेत.

पावसाने आणखी दोन-चार दिवस दडी मारल्यास शेतकऱ्यांना मोटरपंपाद्वारे भात लागवड करण्यासाठी पाण्याची उपलब्धता करावी लागेल. मात्र हे काम खर्चिक असल्याने शेतकऱ्यांना पुन्हा पदरमोड करावी लागू शकते. त्यासाठी शेतकरी किमान काही दिवस तरी पावसाने दडी मारू नये, अशी प्रार्थना करत आहेत.

## येत्या निवडणुकीत मुस्लिम समाजाला गृहीत धरणं राजकीय पक्षांना महागात पडणार - सलिम सारंग

प्रतिनिधी
■ मुंबई

देशाच्या राजकारणातून मुस्लिम टक्का नामशेष होत असून ही समाजासाठी अतिशय गंभीर बाब आहे. यासाठीच मुस्लिम वेल्फेअर असोसिएशनच्या माध्यमातून मुस्लिम समाज एका छत्राखाली एकत्र आला असून संसद आणि राज्यांच्या विधानमंडळांमध्ये समाजाच्या कमी प्रतिनिधित्वाच्या कारणांचा अभ्यास करून ही दरी भरून काढण्यासाठी तातडीने प्रयत्न करण्यात येण्याबाबत मुस्लिम वेल्फेअर असोसिएशन (MWA) द्वारे शनिवार व रविवार रोजी आयोजित केलेल्या मुस्लिम लीडरशिप समिट 2024 मध्ये चर्चा करण्यात आली. या उद्देशासाठी मंजूर करण्यात आलेल्या ठरावानुसार, भारतभरातील मुस्लिम प्रतिनिधींसह एक समिती स्थापन करण्यात येणार आहे.



या समितीचे अध्यक्ष आंतरराष्ट्रीय ख्यातीचे इस्लामिक विद्वान खलील-उर-रहमान सज्जाद नोमानी साहेब असतील - जे ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचे स्तंभ आहेत. तसेच, ज्येष्ठ धर्मगुरू जनाब तौकीर रझा खान साहेब या समितीचे मार्गदर्शन करतील. मुस्लिम वेल्फेअर असोसिएनचे संस्थापक व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि राजकारणी सलीम सारंग या समितीचे सदस्य आणि निमंत्रक असतील.

"लवकरच पूर्ण समितीची घोषणा केली जाईल. तिच्या माध्यमातून सविस्तर अभ्यास करण्यात येईल आणि लोकसभा आणि राज्यसभा, राज्य विधानसभा आणि परिषदा, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, पंचायतींमध्ये तसेच समित्या, ग्रामपंचायती, सोसायट्या, समित्या, बँका इत्यादी मुस्लिमांचे प्रतिनिधित्व वाढेल याची खात्री करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील," असे सारंग यांनी बैठकीत घेतलेल्या निर्णयांची माहिती देताना सांगितले. सारंग यांच्या म्हणण्यानुसार, समिती देशभरात फिरून खासदार, आमदार आणि आमदार, धार्मिक विद्वान, विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ, विद्यार्थी आदींची भेट घेणार आहे.

या परिषदेला खा. जावेद अली खान (समाजवादी पक्ष), खा. मुझ्झुल्ला खान (समाजवादी पक्ष) आणि खा. झिया उर रहमान बारक (बिजू जनता दल) असे तीन राज्यसभा खासदार तसेच आमदार अस्लम शेख (काँग्रेस), अमीन पटेल (काँग्रेस), झिशान सिद्दिकी (काँग्रेस), अबू असीम आझमी (समाजवादी पार्टी) आणि नवाब मलिक (राष्ट्रवादी), इक्बाल मेमन ऑफिसर, अध्यक्ष, ऑल इंडिया मेमन जमात, उजमा नाहिद, सामाजिक कार्यकर्त्या, अब्दुर रहमान, माजी पोलीस महानिरीक्षक, शब्बीर भोपाळवाला, प्रतिनिधी बोहरा समुदायाचे, शिया समुदायाचे प्रतिनिधी मौलाना झहीर अब्बास आणि मुस्लिम कल्याण संघटनेच्या महासचिव शबाना खान उपस्थित होते.

## फेरीवाला समितीवर एनजीओ, नागरिकांच्या नियुक्तीसाठी नवीन अर्ज मागवा

### माजी नगरसेवकाची पालिका आयुक्तांकडे मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

फेरीवाला समितीवर प्रतिनिधींची निवडणूक घेण्यासाठी आवश्यक प्रक्रिया सुरु झाली आहे. मात्र फेरीवाला समितीवर नियुक्तीसाठी एनजीओ, एएलएम तसेच नागरिक गटांकडून नवीन अर्ज मागवण्यात यावेत, ७ ते ८ वर्षापूर्वीच्या अर्जांचा विचार करू नये अशी मागणी भाजपचे माजी नगरसेवक मकरंद नार्वेकर यांनी मुंबई महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

फेरीवाला प्रतिनिधींच्या निवडणुकीसाठी यादी तयार झाली आहे. या यादीला मंजुरीही मिळाली आहे. आता फेरीवाला समिती नियुक्ती केली जाणार आहे.त्यासाठी निवडणूक घेतली जाणार आहे. या समितीवर एनजीओ व नागरिकांच्या प्रतिनिधींची नियुक्ती का केली जात नाही असा सवाल नार्वेकर यांनी विचारला आहे. यासाठी सात - आठ वर्षापूर्वीच्या अर्जांचा विचार करू नये. कारण या कालावधीत बरेच बदल झाले आहेत. असेही नार्वेकर यांनी म्हटले आहे.

**PUBLIC NOTICE**

**CASTROL INDIA LIMITED**
**First Floor, B wing, Technopolis Knowledge Park, Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai - 400 093, Maharashtra**

NOTICE is hereby given that the certificates for the undermentioned securities of the Company has been lost and the holder of the said securities / applicant has applied to the Company to issue duplicate certificates. **Folio No. A 0001628.**
Any person who has a claim in respect of the said securities should lodge such claim with the Company at its Registered Office within **15 days** from this date, else the Company will proceed to issue duplicate certificates without further intimation.

| Name Of Holder | Kind And Face Value Of Securities | No. Of Securities | Certificate No | Distinctive Numbers |
|---|---|---|---|---|
| 1. Amitabh Samanta (As registered with company) | Equity & FV Rs.5 | 1536 | 0 | 0 |
| | Equity & FV Rs.5 | 1536 | 0 | 0 |
| Amitabh Girija Samanta (as per supporting documents) | Equity & FV Rs.5 | 1536 | 9488 | 10225415 to 10226950 |
| | Equity & FV Rs.5 | 1536 | 11857 | 10226951 to 10228486 |

**शुद्धिपत्रक**

सदर शुद्धपत्राच्या मार्फत आपणास कळवितो की, मी माझे अशिल मार्फत म्हणजेच श्री. हर्षद खंडू पाटील हयांच्याकडून सदनिका नं . ए / २०१, दुसरा मजला, क्षेत्र ५५५ चौ. फुट म्हणजेच ५१.५७ चौ. मिटर बिल्डअप हया सदनिकेचे मे. नमन इंटरप्राईजेस आणि श्री. विनायक आर. पाष्टेकर व सौ . मानसी व्ही. पाष्टेकर हयांनी दिनांक- १७/०६/२००५ रोजी विकत घेतलेले पण मी दिलेल्या शुदधपत्रका मध्ये नजरचुकीने दिनांक- २७/०६/२००५ असे नमुद केलेले आहे व रूम नं. ए / २०१ च्या जागी रूम नं. ए / ०१ असे नमुद केलेले आहे तरीही हया शुद्धपत्रकाने चुक दुरूस्त करून वाचण्यात यावी .

ॲड. रंजन हाशा पाटील,
ऑफीस नं. १०२, कुंती सदन, मंगल कार्यालय हॉलच्या खाली, विर सावरकर मार्ग, विरार (पू),
ता - वसई, जि - पालघर - ४०१३०५

**जाहीर सूचना**

याव्दारे सूचना देण्यात येते की, १) श्री. सुशिल कुमार उपाध्याय आणि २) श्री. संजय कुमार उपाध्याय यांनी मे. एम. आय. बिल्डर्स, भाईंदरची भागीदारी संस्था यांच्याकडून इंड. गाळा प्रिमायसेस धारक क्र. १० ए, तळमजला, एम. आय. उद्योग नगर प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोयासटी लि., गोडदेव नाका, भाईंदर (पूर्व) ठाणे ४०१ १०५ धारक परिसर विक्री करार दिनांक ............. (यापुढे ''सदर मालमत्ता'' म्हणून संदर्भित, ज्याचा उल्लेख येथे खाली दिलेल्या परिशिष्टामध्ये अधिक सविस्तर वर्णन केलेला आहे.) अन्वये खरेदी केली आहे. त्यानंतर १) श्री. सुशिल कुमार उपाध्याय आणि २) श्री. संजय कुमार उपाध्याय यांनी २ एप्रिल १९९० च्या विक्री करारा अन्वये सदर मालमत्ता श्री. दिलीप बी. मुझुमदार यांना विकली आणि हस्तांतरित केली. १) श्री. सुशिल कुमार उपाध्याय आणि २) श्री. संजय कुमार उपाध्याय आणि मे. एम. आय. बिल्डर्स यांच्या दरम्यान निष्पादित विक्री करार दिनांक ...... हरविला , गहाळ झाला आहे आणि सर्वोत्तम प्रयत्न करूनही ते सापडले नाही आहेत. सदर मुळ दस्तावेज ताब्यात असलेली कोणतीही व्यक्ती किंवा कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्तींचा सदर मालमत्ता किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या समक्ष किंवा त्या संदर्भात वारसाहक्क, गहाण, ताबा, विक्री, बक्षिस, भाडेपट्टा, धारणाधिकार, प्रभार, विश्वस्त, देखभाल, सुविधाधिकार, हस्तांतरण, परवाना एकतर कोणत्याही खटला/खटल्यांतील वाद / किंवा अन्य काही किंवा कोणतेही हक्क किंवा त्यामधील जे काही हितसंबंध यांच्या स्वरूपांचा कोणताही दावा असल्यास त्यांनी तो आम्हाला आमच्या कार्यालयात १०४, हिना कॉम्प्लेक्स, मंगल मूर्ती हॉस्पिटलच्या मागे, बी. पी. क्रॉस रोड, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे पुष्ठर्थ दस्तावेजासह सदरहू प्रकाशनाच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत लिखित मध्ये कळविणे आवश्यक आहे, त्यानंतर कोणत्याही दाव्याचा विचार केला जाणार नाही आणि असे दावे, जर असल्यास, ते सोडून दिले असे समजण्यात येतील.

**वरील संदर्भित परिशिष्ट**

मीरा भाईंदर महानगरपालिका, भाईंदर, जिल्हा ठाणे यांच्या अधिकार क्षेत्राच्या अंतर्गत नोंदणी उप -जिल्हा आणि जिल्हा ठाणे असलेला आणि महसुल गाव गोडदेव मध्ये स्थित आणि असलेल्या जूना सर्व्हे क्र. ११६, नवीन सर्व्हे क्र. ९८ आणि हिस्सा क्र. ५ मोजमापित अंदाजे .... चौ. यार्ड्स धारक प्लॉटवरी बांधकाम केलेल्या गोडदेव नाका, भाईंदर (पूर्व) ठाणे ४०१ १०५ येथे स्थित नोंदणी क्र. टीएनए/ (टीएनए)/ जीएनएल/ (सी)/ ६६८/ १९९३- १९९४ अंतर्गत नोंदणीकृत मे. एम. आय. उद्योग नगर प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोयासटी लि. म्हणून ज्ञात सोसायटीमधील मोजमापित अंदाजे ३६० चौ. फू. किंवा ३३.४५ चौ. मी. सुपर बिल्ट अप क्षेत्राच्या तळमजल्यावरील इंड. गाळा परिसर क्र. १० ए चे सर्व काही.

ठिकाण : भाईंदर
दिनांक : १३/०८/२०२४

वकिल
सोनाली तावडे

## फरार गुप्ता बंधूंशी उद्धव ठाकरेंचे व्यावसायिक संबंध?

### शिवसेना उपनेते व प्रवक्ते संजय निरुपम

प्रतिनिधी
■ मुंबई

देहरादूनमधील एका बिल्डरच्या हत्येतील आरोपी आणि आफ्रिकेतील घोटाळेबाज व्यापारी गुप्ता बंधूंशी उद्धव ठाकरे यांचे कोणते व्यावसायिक संबंध आहेत ? अशी शंका शिवसेना उपनेते व प्रवक्ते संजय निरुपम यांनी केला. ते काल पत्रकार परिषदेत बोलत होते.

निरुपम म्हणाले की, ७ ऑगस्ट २०२४ रोजी संध्याकाळी संजय राऊत यांच्या दिल्लीतील शासकिय निवासस्थानी उद्धव ठाकरेंनी गुप्ता बंधूंपैकी एकाची भेट घेतली. याबाबत संजय राऊत यांच्या घरातील सीसीटीव्ही तपासणे आवश्यक आहे. उबाठा जेव्हा दिल्लीत जातात तेव्हा हॉटेल ताज किंवा मौर्य हॉटेलमध्ये वास्तव्य करतात पण यावेळी ते संजय राऊत यांच्या शासकीय निवासस्थानी का थांबले होते? असा प्रश्न त्यांनी यावेळी उपस्थित केला.

दिल्ली दौऱ्यात उद्धव ठाकरे अजय गुप्ताला भेटले का ? असा सवाल संजय निरुपम यांनी केला. अजय गुप्ता बिझनेसमन आणि कुख्यात गुंड आहे. बाबा सहानी यांच्या आत्महत्येतील आरोपीशी उद्धव ठाकरे यांचा व्यावसायिक संबंध असल्याची शक्यता (?) निरुपम यांनी व्यक्त केली. त्याचबरोबर उबाठाला नुकताच निवडणूक आयोगाने देणगी स्वीकारण्यास परवानगी दिली, मग गुप्तासोबत भेट ही निवडणूक निधीसाठी होती का? असा प्रश्न निरुपम यांनी विचारला.

**जाहीर नोटीस**

या नोटीसीव्दारे तमाम नागरीकांना कळविण्यात येते कि, श्रीम. सुमित्रा सुरेश गभाले रा. आसे ता. मोखाडा जि. पालघर यांनी स्वतःच्या जन्माची नोंद उशीराने होउन मिळणेवावत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केलेला आहे. श्रीम. सुमित्रा सुरेश गभाले यांच्या जन्माची तारीख ०८/०८/२००४ व जन्मस्थळ. आसे ता. मोखाडा असलेबाबत अर्जात नमुद केले आहे. ग्रामसेवक कार्यालय आसे ता. मोखाडा जि. पालघर यांच्या अभिलेखात जन्माची नोंद करण्यात आली नसल्याबाबत जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र या न्यायालयात सादर केलेले आहे. सदर प्रकरणी निम्न स्वाक्षरीकार यांचे या न्यायालयात सुनावणीचे कामकाज चालु आहे. प्रकरणी नागरीकांचा आक्षेप/तक्रार/हरकती असल्यास त्यांनी आवश्यक त्या दस्तऐवजासह नोटीस प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात या न्यायालयात दाखल करावे. नमुद कालावधी नंतर येणा-या आक्षेप तक्रार हरकतीचा विचार केला जाणार नाही. तसेच कोणतीही हरकत/ आक्षेप /तक्रार या कार्यालयास प्राप्त न झाल्यास जन्म मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील तरतुदीनुसार नोंदीच्या अर्जाबाबत निर्णय घेण्यात येईल, त्याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**केस क्रमांक महिना/जन्म-मृत्यू रजिस्टर/ SR-261/2024**
**दिनांक:- २५/०७/२०२४**
**ठिकाण:- मोखाडा**

निवासी नायब तहसीलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी मोखाडा

प्रत-१. गटविकास अधिकारी, पंचायत समिती मोखाडा,
2/-सदरची नोटीस बोर्डावर प्रसिध्द करून जबाब पंचनाम्यासह अहवाल सादर करावा.
2) तलाठी सजा आसे
2/-सदरची नोटीस चावडीवर प्रसिध्द करून जबाब पंचनाम्यासह अहवाल सादर करावा.

**जाहीर नोटीस**

या नोटीसीव्दारे तमाम नागरीकांना कळविण्यात येते कि, श्रीम. रेखा किसन शिंदे रा. किनीस्ते ता. मोखाडा जि. पालघर यांनी स्वतःच्या जन्माची नोंद उशीराने होउन मिळणेबाचत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केलेला आहे. श्रीम. रेखा किसन शिंदे यांच्या जन्माची तारीख- ०९/१२/१९८२ व जन्मस्थळ-किनीस्ते ता. मोखांडा असलेबाबत अर्जात नमुद केले आहे. ग्रामपंचायत कार्यालय किनीस्ते ता. मोखाडा जि. पालघर यांच्या अभिलेखात जन्माची नोंद करण्यात आली नसल्याबाबत जन्माची नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र या न्यायालयात सादर केलेले आहे. सदर प्रकरणी निम्न स्वाक्षरीकार यांचे या न्यायालयात सुनावणीचे कामकाज चालु आहे. प्रकरणी नागरीकांचा आक्षेप/तक्रार/ हरकती असल्यास त्यांनी आवश्यक त्या दस्तऐवजासह नोटीस प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासुन १५ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात या न्यायालयात दाखल करावे. नमुद कालावधी नंतर येणा-या आक्षेप तक्रार हरकतीचा विचार केला जाणार नाही. तसेच कोणतीही हरकत/ आक्षेप /तक्रार या कार्यालयास प्राप्त न झाल्यास जन्म / मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील तरतुदीनुसार नोंदीच्या अर्जाबाबत निर्णय घेण्यात येईल, त्याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**प्रकरण क्र.मह/जन्म-मृत्यु नोंद / एस आर-२२६/२०२४**
**दिनांक:-०९/०७/२०२४**
**ठिकाण:- मोखाडा**

निवासी नायब तहसीलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी मोखाडा

प्रत-१. ग्रामपंचायत कार्यालय किनीस्ते,
2/-सदरची नोटीस बोर्डावर प्रसिध्द करून जबाब पंचनाम्यासह नोटीस प्रसिध्दी केलेबाबतचा अहवाल सादर करावा.
2) तलाठी सजा- किनीस्ते,
2/-सदरची नोटीस चावडीवर प्रसिध्द करून जबाब पंचनाम्यासह नोटीस प्रसिध्दी केलेबाबतचा अहवाल सादर करावा.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस सूचित करण्यात येते की, गाव मौजे गोखिवरे, तलाठी सजाः गोखिवरे, तालुका वसई, जिल्हा-पालघर येथील सर्व्हे क्र. ११६ हिस्सा क्र. ३ ज्याचे एकुण क्षेत्र ९५० चौ.मी., त्यापैकी ५६० चौ.मी. ही जमीन मिळकत **श्री. किरण दशरथ जाधव, श्री. सुनील दशरथ जाधव व श्री. अनील दशरथ जाधव** हयांच्या स्वतंत्र मालकीची व कब्जेवहीवाटीच्या असुन ही जमीन मिळकत माझे अशील **श्री. विवेक अच्युत नाईक, श्री. विपुल भालचंद्र पाटील, श्री. आनंद वसंत राऊत व श्री. सचिन मधुकर पाटील** विकत घेत आहेत. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, तारण, कुळवहिवाट, वारसा, भाडेपटटा, वहिवाट, किवा अन्य स्वरूपाचा दावा असल्यास त्यांनी त्याची लेखी स्वरूपातील महिती योग्य कागदोपत्री पुराव्यानिशी निम्नस्वाक्षरीकर्ता ॲड. जितेश एकनाथ म्हात्रे यांच्याकडे बी/३०१, सुगंधी हाइटस, बोळींज खारोडी नाका, दिशा हॉटेल जवळ, विरार पश्चिम, ता. वसई, जि. पालघर येथे या सुचनेच्या प्रसिध्दीपासुनच्या १४ दिवसाच्या आंत पाठवावी . वर दिलेल्या मुदतीत जर हरकत पोहचली नाही तर सदर मिळकतीचा व्यवहार हरकत विरहित आणि विक्री योग्य आहे व हरकत असल्यास सोडुन दिली आहे असे गृहित धरून माझे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील.

दिनांक: १३/०८/२०२४ सही/-
ॲड. जितेश एकनाथ म्हात्रे

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Twenty Nine
Issu - 54
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- एकोणतीसावे
अंक - ५४
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

जग बदलायचं असेल तर आधी स्वत:ला बदला.



- महात्मा गांधी

वृत्तमानस

मुंबई, मंगळवार, १३ ऑगस्ट २०२४

# स्पर्धा परीक्षेची की जगण्याची...

नवी दिल्लीमधील एका कोचिंग सेंटरच्या तळघरात पाणी साठल्याने तिघा मुलांचा झालेला दुर्दैवी मृत्यू, स्पर्धा परीक्षांच्या कोचिंगचे आपल्या राज्यातील पुणे सर्वत्र या जीवघेण्या स्पर्धेच्या चक्रव्यूहात अडकलेल्या मुलांच्या तणावाचे दर्शन घडते. देशभरामध्ये अनेक शहरांच्या गल्लीबोळात ही स्पर्धा परीक्षांची दुकाने थाटलेली दिसतात. आपल्या देशात अभ्यासाच्या दबावाखाली येऊन आत्महत्या हा मार्ग निवडण्याची तरुण पिढीची मानसिकता नवीन नाही. आता हे आपल्याकडील एकूणच शिक्षण व्यवस्थेचे अपयश आहे का, असा सवाल यातून उपस्थित होतो. कोटासह अन्य ठिकाणी वाढत्या आत्महत्येच्या घटना समाजाचे एकूणच मानसिक स्वास्थ्य ढासळणे आणि कमालीचा निराशावाद बळावला असल्याचे संकेत देतात. खरेतर मानसिक आरोग्यावरचे हे जीवघेणे संकट केवळ आपल्या देशातच नव्हे तर जगभरात वाढीस लागले आहे. साधारण २००७ पासून महाराष्ट्रात स्पर्धा परीक्षेचं वातावरण तयार निर्माण होण्यास सुरुवात झाली. आज ते वातावरण किती मोठ्या प्रमाणात संपूर्ण महाराष्ट्रात पसरलंय आणि त्याचे परिणाम किती भयंकर होत आहेत, याकडे तथाकथित बुद्धिप्रामाण्यवादी सोयीस्करपणे आणि स्पर्धा परीक्षांचे विद्यार्थी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत. हीच गोष्ट अनेकांच्या उद्ध्वस्तीकरणाला कारणीभूत ठरत आहे. या स्पर्धा परीक्षांमध्ये येणारा तरुण जरी वेगवेगळ्या सामाजिक, आर्थिक स्तरातील असला तरी तो प्रामुख्यानं कृषक समाजातील निमशहरी- ग्रामीण भागातील आहे. त्यातही मराठवाड्यातील बीड, परभणी, नांदेड, उस्मानाबाद, लातूर या जिल्ह्यांतल्या तरुणांचे प्रमाण यात अधिक आहे. तुरळक पश्चिम महाराष्ट्र यात डोकावतोय. मात्र मराठवाड्यातल्या मुलांना गेल्या दहा वर्षांत स्थलांतर करत करत का यावं लागतंय, याचा शोध घेतला तर सातत्यानं धोरणांचा- पाण्याचा दुष्काळ, सिंचन आणि औद्योगिक अनुशेष, यातून आकुंचन पावलेल्या सर्व स्तरांतील आर्थिक मंदीतून आलेली बेरोजगारी आदी घटक प्रामुख्याने कारणीभूत आहेत, हे उघड आहे. पावसावर अवलंबून असणारी सोयाबीन, कापूस, ज्वारी ही मराठवाड्यातली मुख्य पिके आहेत. यावर मराठवाड्याची निमशहरी ग्रामीण अर्थव्यवस्थादेखील अवलंबून आहे. कायमस्वरूपी नोकरी म्हणून शासकीय अधिकारी होण्याचा कल गेल्या काही काळात वाढत चालला आहे. शासकीय अधिकारी हा राज्यसंस्थेचा वाहक आणि लोकांचा सेवक असतो. त्याला एवढं वलय. अर्थात काही अल्प अपवादात्मक अधिकारी उत्तम काम करणारे आहेतही, तो मुद्दा नाही. उत्तम प्रशासकीय कारकीर्द असलेल्या अधिकाऱ्यांच्या प्रशंसेसाठी राज्यसंस्था आहे. किंबहुना आदर्शवत काम करणं ही अधिकारी होण्याची पूर्वअट आहे. पण केवळ अधिकारी होण्याच्या अगदी सुरुवातीच्या पायरीवरच त्याची वाहवा समाज, माध्यमं जोरकसपणे करू लागलीत. यातून एक प्रशासन आणि सरकारी नोकरी म्हणजेच यशाचं, सुरक्षिततेचे मिथक बनवलं जातं आहे. कारण हे मिथकं बनणं, बनवलं जाणं, स्पर्धा परीक्षेच्या नफेखोर क्लासेसच्या इंडस्ट्रीची गरज आहे. काही सन्माननीय अपवाद यात असतीलही, पण फक्त ते दोन-चार लोक. इतर वेळी प्रामाणिकपणे धडपडू पाहणारा, आपल्या आयुष्याला अर्थ देऊ पाहणारा मेहनती तरुण अलगदपणे मोटिव्हेशनल स्पीचच्या कृष्णविवरात अडकतो आहे. याचबरोबर शहरी, निमशहरी भागापासून ग्रामीण भागापर्यंत आताच्या शिकत असणाऱ्या आणि शिकून झालेल्या विद्यार्थ्यांसमोर स्पर्धा परीक्षा पास झालेल्या, अधिकारी झालेल्यांची भाषणं मोठ्या प्रमाणात घडवून आणली गेली. मुळात अधिकारी पदावरून लोकसेवेच्या कार्याची सुरुवात शून्य असताना आपल्या जीवनाचा प्रवास किती खडतर होता, हे रंगवून सांगणारी अर्धवट चरित्र पुस्तकांच्या रूपाने बाजारात पोहोचली आहेत. त्यातून जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास, प्रयत्न, सातत्य, कष्ट, सहनशीलता, ध्येय आणि शेवटी यश या सर्व गोष्टी केवळ अधिकारी होण्याकरिताच लागू होतात असा बडेजावपणा आणून विद्यार्थ्यांच्या आशा, आकांक्षा आणि महत्त्वाकांक्षा इतक्या मोठ्या प्रमाणात फुगवल्या गेल्या की, शिक्षण घेऊन सुशिक्षित बेकार होणाऱ्या तरुण-तरुणींची लाट स्पर्धा परीक्षांकडे वळू लागली. त्यामुळे स्वतःच्या मर्यादा आणि क्षमतांची सांगड घालत आपण स्पर्धा परीक्षेत नेमकं कोणत्या पोस्टसाठी लढलं पाहिजे, याचं भान त्याला अजिबात राहत नाही. यूपीएससीचे गाजर दाखवून या मुलांकडून बक्कळ फी उकळली जाते आहे. अर्थात ज्याला त्याला आपल्या क्षमतांचा विकास मेहनीतीच्या जोरावर करता येतो. पण मास मोटिव्हेशननं आलेली खुमारी त्याचा खिशातून अलगद फी काढून घेते. मोटिव्हेशन गाइडन्स आणि मिसगायडन्स यात एक बारीक सीमारेषा आहे. दुर्दैवाने हे ओळखण्याची कुवत या वातावरणात तो हरवून बसलेला आहे. म्हणूनही इंट्रोडक्टरी सेमिनार, नंतरची फाउंडेशन बॅच, नंतरचे रेग्युलर क्लासेस, विषयनिहाय क्लासेस ही शृंखला न थांबता सुरूच राहते. स्पर्धा परीक्षांसाठी एक विशिष्ट संस्कृती पोसून आपण एक संबंध पिढी फाजील आत्मविश्वासाने नौकेत बसवली आहे. ही नौका कोणत्या किनाऱ्यावर जाऊन आदळेल, त्यात किती जण टिकतील, किती जण माघारी फिरू शकणार नाहीत, किती जणांचा उमेदीचा काळ या प्रवासात खर्ची जाईल, किती जण नैराश्यातून बाहेर येतील, असे असंख्य प्रश्न आता निर्माण झाले आहेत. पण हे प्रश्न कोणाला विचारायचे? या परिणामांचं उत्तरदायित्व कोणाच्या खांद्यावर आहे? या सर्व गंभीर प्रश्नांचं उत्तर समाज म्हणून कधी तरी आपल्यालाच द्यावं लागणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रात स्पर्धा परीक्षेच्या क्लासेसचा भरणा आहे. तरीसुद्धा शहरी व निमशहरी आणि ग्रामीण भागातील तरुणांना पुण्यातील क्लासेसविषयी खूप आकर्षण वाटतं. हे क्लासेसवाले सुरुवातीला प्रवेश विनामूल्य या बॅनरखाली व्याख्यानं भरवतात. त्यातून स्पर्धा परीक्षेच्या क्लासेसची गरज कशी आहे, आम्ही मार्गदर्शक म्हणून कशी भूमिका बजावतो, आमच्या ॲकॅडमीमधून आतापर्यंत किती आयएएस, आयपीएस आणि आयएफएस झाले यांची रसभरीत वर्णनं सांगितली जातात. अप्रत्यक्षपणे क्लासेस स्पर्धा परीक्षा करण्याकरिता किती गरजेचे आहेत, हे विद्यार्थ्यांच्या मनावर पुनःपुन्हा बिंबवलं जातं. स्पर्धा परीक्षेचा झालेला प्रचार अन् प्रसार यामुळे अंगभूत कलेची हत्या करून प्रत्येक विद्यार्थी हा माझ्या शेजारचा, माझ्या सोबतचा मुलगा किंवा मुलगी स्पर्धा परीक्षा करते म्हणून मीही करते किंवा करतो, हे चारचौघांत मान्य करायला कोणी तयार नसतं. आणि म्हणून एकाकडे पाहून दुसरा, दुसऱ्याकडे पाहून तिसरा अन् तिसऱ्याकडे पाहून चौथा स्पर्धा परीक्षा करीत सुटतो. याचा परिणाम म्हणून विद्यार्थी स्पर्धा परीक्षाग्रस्त व्हायला लागतात आणि हा संसर्गजन्य रोग झपाट्याने वाढतच आहे. शे-पाचशेच्या जागांसाठी लाखो अर्ज येतात. जागा कमी अन् जीवघेणी स्पर्धा जास्त अशी स्थिती होते. सतत भासणारी आर्थिक चणचण, वाढते वय, घरची जबाबदारी, सामाजिक तणाव, यशाची अजिबात खात्री नाही, सततच्या अपयशामुळे येणारं नैराश्य, स्वतःची घुसमट कमी दर्जाचे काम करण्याची नसलेली मानसिकता, मुलींच्या बाबतीत घरातून लग्नासाठी होत असलेली घाई. त्यातून मुलींचा वाढत जाणारा तणाव या सर्व नकारात्मक बाजू स्पर्धा परीक्षेच्या कृत्रिम वातावरणातून जन्म घेतात.विद्यार्थी आणि पालकसुद्धा त्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे बरेचदा निराशा पदरात पडते. एकूणच जीवघेण्या स्पर्धेच्या या चक्रव्यूहात सापडलेली ही तरुण पिढी त्यातून कशी व कधी बाहेर पडणार, हेच मोठे आव्हान भविष्यात राहणार आहे.

# ध्वजसंहितेचे पालन करून घरोघरी तिरंगा फडकवावा!




यावर्षी आपण ७८ वा भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा करीत आहोत. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला इंग्रजांच्या गुलामीतून स्वातंत्र्य मिळाले त्या घटनेला आज ७७ वर्ष पूर्ण झाली आहेत. अर्थात हे स्वातंत्र्य आपल्याला सहजासहजी मिळाले नाही हे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली कित्येकांना तुरुंगवास भोगावा लागला. हजारो, लाखो क्रांतिकरांकांच्या, स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागातून आपल्याला हे स्वातंत्र्य मिळाले आहे. या हजारो, लाखो ज्ञात- अज्ञात क्रांतिकारकांच्या, स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याची ओळख आजच्या पिढीला व्हावी व त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन आजच्या तरुण पिढीनेही देशकार्यासाठी पुढे यावे या उद्देशाने देशभर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उत्साहात साजरा करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमांतर्गत अनेक उपक्रमांचे आयोजन सरकारने केले आहे त्याचाच एक भाग म्हणून आजपासून म्हणजे १३ ऑगस्ट पासून १५ ऑगस्ट पर्यंत घरोघरी तिरंगा हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

या उपक्रमाअंतर्गत भारताच्या ध्वज संहितेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून भारताच्या नागरिकांना आपल्या घरी ध्वज फडकविण्याची परवानगी देण्यात आली. या दिवशी देशातील नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा ध्वज अभिमानाने फडकवावा असे आव्हान सरकारतर्फे करण्यात आले आहे. घरोघरी तिरंगा या उपक्रमाची जनजागृती व्हावी यासाठी देशभर विविध कार्यक्रम चालू आहेत. तिरंगा हा आपला राष्ट्रध्वज आहे. देशाचे मानचिन्ह म्हणजे तिरंगा. स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन या सारख्या राष्ट्रीय सणांच्या दिवशी तिरंगा अभिमानाने फडकावून तिरंग्याला मानवंदना देणे हे आपले कर्तव्यच आहे. १३, १४ आणि १५ या तीन दिवशी सर्व नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा अभिमानाने फडकवावा आणि तिरंग्याला मानवंदना द्यावी.

घरोघरी तिरंगा फडकवताना ध्वज संहितेचे काटेकोरपणे पालन करावे. ध्वज फडकवताना ध्वजाचा कुठल्याही प्रकारे अवमान होणार नाही याची काळजी नागरिकांनी घ्यावी. पूर्वी ध्वज तयार करण्यासाठी हाताने विणलेले किंवा कातलेले कापड वापरले जाई आता यंत्रावर तयार केलेले कापड देखील तयार करण्यास परवानगी देण्यात आली आहे मात्र हा कापडी तिरंगा ध्वज, चुरगळलेला, फाटलेला, किंवा खराब झालेला नसावा. ध्वज फडकवताना केशरी रंग वरच असावा कोणत्याही परिस्थितीत तो तळाशी राहणार नाही याची काळजी घ्यावी. तिरंगा ध्वज फडकवताना तिरंग्यापेक्षा जास्त उंचीवर किंवा शेजारी दुसरा कोणताही ध्वज फडकवू नये. एकाच ध्वजारोहणाच्या खांबावरती तिरंग्या सोबत दुसरा कोणताही ध्वज फडकवू नये. तिरंगा उंचावरच फडकावा. तिरंगा फडकवल्यानंतर तो खाली पडणार नाही याची काळजी घ्यावी. ध्वज उतरवताना देखील ध्वज संहितेचा मान राखावा. सन्मानपूर्वक ध्वज उतरावा. कुठल्याही परिस्थितीत तिरंग्याचा अवमान होणार नाही याची काळजी नागरिकांनी घ्यावी कारण तिरंगा हे आपले राष्ट्रीय प्रतीक आहे तिरंग्याला अपमान म्हणजे देशाचा अपमान. १५ ऑगस्ट नंतर तिरंगा ध्वज व्यवस्थित घडी घालून सन्मानपूर्वक ठेवावा. ध्वज संहितेच्या नियमांचे पालन करून प्रत्येकाने आपल्या घरावर डौलाने तिरंगा फडकवावा व घरोघरी तिरंगा हा उपक्रम यशस्वी करावा. जयहिंद ! जयभारत!!

- श्याम ठाणेदार
पुणे

# मराठी माणसांची एकजूट ठेवा हेच दोन्ही बंधूंना साकडे !



**उल्हास दिघे**
(दिघे सर, निवृत्त पर्यवेक्षक- इंडियन एज्युकेशन सोसायटी) BSc. BEd.

मी ज्याविषयी माझ्या मनातील बऱ्याच दिवसांची तळमळ मांडणार आहे. त्या विषयासाठी कसल्याही प्रस्तावनेची गरजच नाही. हा विषय जगजाहीर आहे. महाराष्ट्रातल्या दोन मातब्बर नेत्यांविषयी ही तळमळ आहे.

आदरणीय राजसाहेब आणि आदरणीय उद्धवजी हे दोन नेतेच महाराष्ट्रातील गलिच्छ झालेले राजकारण स्वच्छ करू शकतील ही त्यांची ताकद आपल्या सर्वांनाच माहीत आहे.

राज साहेब आणि उद्धवजी यांच्या बद्दल विचार मांडताना मी मोकळेपणाने त्यांच्या आणि माझ्या वैयक्तिक संबंधांविषयी थोडे सांगतो. दोघांशीही त्यांच्या लहानपणापासून माझा संबंध राहिला आहे. राज साहेबांशी जास्त संबंध आला नाही, तरी पण आम्ही त्यांच्यासमोर गेलो की आमच्या वयाचा आदर करत ते अत्यंत विनम्र असत; आम्हालाच ओशाळल्यासारखं व्हायचं. एवढं मोठी व्यक्तिमत्व (त्यावेळी सुद्धा )असूनही सुसंस्कारांचा केवढा परिणाम असतो याची प्रचिती यायची.

मात्र उद्धवजींच्या बाबतीत ते आठ नऊ वर्षांचे असताना सुद्धा (माझं मातोश्रीवर अधून मधून जाणं-येणं असायचं) ते माझ्याशी मैत्रीपूर्ण वागत असत. कधी कधी जुन्या मातोश्रीच्या अंगणात तुळशी वृंदावना भोवती त्यांना माझ्या पाठीवर घोडा घोडा करत खेळावे लागे. पुढे पुढे माझ्याबद्दल त्यांच्या मनात विश्वासाची भावना असे ,(अजूनही आहे ) मी दादर टीटी, पारसी कॉलनी, वडाळा, नायगाव, किंग सर्कल इत्यादी भागांचा पहिला शाखाप्रमुख. इ.स. 2009 साली राजसाहेब मूळ शिवसेनेपासून बाजूला झाले आणि त्यांनी मनसे या जबरदस्त आक्रमक पक्षाची स्थापना केली. अर्थात आदरणीय बाळासाहेबांच्या मनाला राज साहेब बाहेर पडल्याची खंत त्यांनी ठाण्याच्या एका भाषणात बोलूनही दाखवली.

राज साहेबांनी मुसंडी मारून पहिल्याच फटक्यात काही महानगरपालिकांमधून इतकंच काय विधानसभेत सुद्धा 13 आमदार निवडून आणून घवघवीत यश संपादन केले.

जोपर्यंत मराठी माणसासाठीच ही चळवळ उभी होती तोपर्यंत त्यांना जनतेचे सहकार्य मिळत गेले परंतु नंतरच्या काळात राजकारणात बऱ्याच उलाढाली घडल्या. उद्धवजींचाही दबदबा वाढत राहिला; "करून दाखवलं"; या उक्तीने त्यांनीही महानगरपालिका विधानसभा आणि लोकसभा प्रचंड प्रमाणात जिंकल्या.

मात्र हे होत असताना या दोन उत्तुंग नेत्यांच्यातली दरी वाढत चालली.

अलीकडच्या पाच-सहा वर्षात राजकारणाने इतका खालचा दर्जा गाठला की कित्येक नेत्यांचं राजकीय भान सुटत गेलं. शिवसेनेत फूट पडत गेली. या दोन भावांच्या दुराव्याने गळचेपी मात्र मराठी माणसांची होऊ लागली.

स्वर्गीय बाळासाहेबांनी अक्षरशः रक्ताचं पाणी करून आपलं संपूर्ण कुटुंब मराठी माणसांवर होणारे अन्याय, अत्याचार दूर करण्यासाठी या चळवळीत झोकून दिलं ; त्या चळवळीत फूट वाढत गेली. राज साहेबांचा सवता सुभा थोडा निष्प्रभ होत गेला. ही फूट मराठी माणसांच्यात प्रचंड दरी निर्माण होण्याइतपत वाढली .

कार्यकर्ते चलबिचल करू लागले. दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते बिथरू लागले. त्यातून विरोधक आणखी आगीत तेल घातल्यासारखे या कार्यकर्त्यांना भडकवू लागले आणि आता मागच्या तीन-चार दिवसात दोन्ही बाजूंनी अगदी खालच्या थराचं विदीर्ण चित्र महाराष्ट्रातल्या आम जनतेला पहायला मिळालं. अशा प्रसंगांनी कार्यकर्त्यांच्या आक्रमक आणि असमंजस वागण्याचे मराठी माणसाच्या मनावर कठोर आघात होऊ लागले आहेत.

या सर्व घडामोडींमुळे मराठी माणसांच्या मनात फार फार मोठी फारकत पसरत असून याचा परिणाम मराठी माणसांच्या दृष्टीने हानिकारक होणार आहे. मराठी माणसाला नेताच राहणार नाही. जिवाचं रान करून बाळासाहेबांनी उभारलेली प्रचंड चळवळ नष्ट होईल की काय अशी भीती वाटू लागली आहे .

पानिपतचे 1761 चे युद्ध मराठी माणसाने जिंकता जिंकता शेवटच्या क्षणी फितुरीमुळे म्हणा किंवा कसेही म्हणा, मराठे फार मोठ्या नामुष्कीने हरले. तशीच मराठी माणसाची ही चळवळ लयाला जाईल की काय असे वाटू लागले आहे.

आता मी 80 व्या वर्षात पोहोचलो आहे, शिवसेना जन्माच्याही आधीपासून माझ्यासारख्या लाखोंनी बाळासाहेबांच्या विचारांना बळ दिलं . ते विचार मनामनात रुजवायला आम्ही प्रत्येकाच्या परीने हातभार लावला. आज माझ्यासारख्या अशा असंख्य माणसांना कार्यकर्त्यांना काय वेदना होत असतील याची कल्पना करणं सुद्धा वेदनादायक होईल.

मग हे सावरायचं कसं? हा प्रश्न मनात येतो .

पण जर राज साहेबांनी आणि उद्धवजींनी मनावर घेतलं तर मराठी माणसाची दुही थांबून मराठी माणूस पुन्हा एकसंघ होऊन अभिमानाने उभा राहू शकेल. आमचे हे दोन्ही नेते महाराष्ट्रातलं नीच राजकारण नाहीसं करून महाराष्ट्राची शान पुन:प्रस्थापित करू शकतील.

मात्र त्यासाठी दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी संयम बाळगणे आवश्यक आहे अरे ला का रे करू नका. दोन्ही पक्ष एकत्र येण्याची वेळ निघून गेलेली आहे पण एक उत्तम मार्ग आहे की दोन्ही नेत्यांनी मराठी माणसांना एकत्र बांधून ठेवण्यासाठी एकमेकांना राजकीय विरोध न करता, दोन्ही पक्षांना पूरक राजकारण करावे . आपापले पक्ष वाढवायचेत तेवढे वाढवा पण मराठी माणसांना एकत्र ठेवा हीच दोघांनाही नम्र विनंती.

जय हिंद! जय महाराष्ट्र !!!

## पत्र मानस

### भारताने शांतीसेना पाठवावी

बांगलादेशात जहालवादी अर्थात मुस्लीम कट्टरपंथी संघटनांनी देशात जबरदस्तीने सत्तांतरण घडवून आणले आहे. बांगलादेशाच्या माजी पंतप्रधान शेख हसीना आणि भारताचे हितसंबंध अलीकडच्या काळात चांगलेच सुधारले होते त्यामुळेच बांगलादेशाच्या विकासात भारताची फार मोठी भूमिका राहिली आहे. बांगलादेशात आरक्षण विरोधातील विद्यार्थी आंदोलन हिंस्त्र झाल्याचे वरवर बोलले जात असले तरी आंतरराष्ट्रीय कटाचा एक भाग असण्याची जास्त शक्यता आहे. बांगलादेशात दिवसेंदिवस तेथील अल्पसंख्यांक म्हणजे हिंदूंची हत्या आणि त्यांच्या संपत्तींची मोठ्या प्रमाणात नासाडी होत आहे. थोडक्यात हे सर्व तात्काळ थांबवण्यासाठी भारत सरकारने लष्कराची 'शांतीसेना' बांगलादेशात पाठवणे हाच एकमेव पर्याय सध्यातरी दिसत आहे असे वाटते.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला**

### हिंडेनबर्गवर कायदेशीर कारवाई करावी

सेबीच्या अध्यक्षा माधबी पुरी हूच यांनी अदाणी घोटाळ्यात वापरण्यात आलेल्या दोन परदेशी फंडांमध्ये भागीदारी असल्याचा आरोप हिंडेनबर्ग ने केला.सेबीच्या अध्यक्ष माधवी बुच यांनी हिंडेनबर्ग रिसर्चने केलेले आरोप निराधार असून यात कोणतेही तथ्य नसल्याचे म्हटले आहे.वित्त मंत्रालयाने देखील सेबी वरचे आरोप फेटाळले आहेत.हिंडेनबर्ग केलेल आरोप द्वेषपूर्ण, खोडसाळ आणि फसवे असल्याची टीका अदाणी समूहाने केली आहे. सेबीच्या विश्वार्हतेवर हल्ला करण्याचा प्रयत्न हिंडेनबर्गने केल्याने हिंडेनबर्गवर कायदेशीर कारवाई करावी. अदानी समूहाचे शेअर्स कोसळल्याने गुंतवणूकदारांचे मोठे नुकसान झाले आहे. अदानी समूहानेही कारवाई करावी.यापूर्वी सेबीने हिंडेनबर्ग रिसर्चवर कारवाई केलेली आहे. हिंडेनबर्ग रिसर्च वारवांर आरोप केल्यास सेबीची विश्वासार्हता धोक्यात येईल.

**- विवेक तवटे, ठाणे**

### आत्मपरीक्षणाची गरज !

पॅरिस ऑलम्पिक साठी गेलेल्या आपल्या ११७ खेळाडूंनी सुवर्णपदकाविना केवळ सहा पदकांची कमाई करून आपली मोहीम संपवली. १४० कोटी लोकसंख्येच्या देशाचा ऑलम्पिक मधील रिझल्ट पाहता ही कामगिरी निराशा जनक म्हटली पाहिजे. इतर छोट्या छोट्या देशांनी सुवर्णासह अन्य पदकांची लय लूट केली आम्ही मात्र एकही सुवर्णपदक पटकावू शकलो नाही. खेळांडूवर मेहनत घेतली जातेय, क्रीडा क्षेत्रावर अवाढव्य खर्चही केला जातोय तरीसुद्धा रिझल्ट मात्र मिळत नाही हे कटू सत्य आहे. यावर सर्वांनी क्रीडातज्ञ, क्रीडा प्रशासन, आजी-माजी क्रीडापटू यांनी एकत्रितपणे येऊन आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे पुढील ऑलम्पिकला पॅरिस येथील चित्र बदलण्याची जिद्द बाळगूनच.

**- विश्वनाथ पंडित, ठाणे**

### कार्यकर्ते - गृहीत धरलेले...

कुठल्याही पक्षाचे कार्यकर्त हे नेत्यासाठी काहीही करायला तयार असतात. हेच कार्यकर्ते एकमेकांची डोकी फोडायलाही मागेपुढे पाहत नाहीत. पण तसे नेत्यांचे नसते.राजकीय व्यासपीठावरुन बोलताना नेते एकमेकाचे वाभाडे काढतात. पण सार्वजनिक जीवनात वावरताना मात्र मैत्रीचे संबंध जोपासतात. राजकीय घराण्यातील लग्नसमारंभांत हे वारंवार दिसून आले आहे. असे असतानाही कार्यकर्ते मात्र एकमेकांतून विस्तव जाऊ देत नाहीत. समाजमाध्यमांचा वापर वाढल्यापासून हेच कार्यकर्ते विरोधकांवर टीका करताना टोकाची भूमिका मांडतात आणि गलिच्छ भाषा वापरतात. कार्यकर्त्यांमधील हा वैरभाव रस्त्यावर उतरला की हाणामारीचे प्रसंग उद्भवतात. प्रसंगी तुरुंगाची पायरी कार्यकर्त्यांना चढावी लागते. नेत्यांमध्ये नंतर दिलजमाई झाल्यावर याच कार्यकर्त्यांची मन:स्थिती काय होत असेल? की त्यांना गृहीतच धरले जाते.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

### उध्दव ठाकरेंची पुन्हा एकदा शांत संयमी महाराष्ट्र हिताची भूमीका

शनिवारी ठाण्यात शिवसेनेचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांची गडकरी रंगायतन येथे सभा होती, सभागृह जवळपास २ ते ३००० शिवसैनिकांनी हाऊसफूल होवून बाहेरही तोबा गर्दी होती, मनसेच्या जेमतेम १० ते १५ कार्यकर्त्यांनी सभा स्थळी गोंधळ घालाण्याचा प्रयत्न केला त्यावर राज ठाकरेंनी कौतूक वैगेरे केल्याच्या बातम्या आल्या. उध्दव ठाकरेंनी फक्त एक आदेशाचे बोट वर केल असते तर ठाण्यात २००० ते ३००० शिवसैनिकांचा रुद्रअवतारापूढे मनसेच्या कार्यकर्त्यांची अवस्था दयनीय झाली असती. मध्यंतरी मिटकरी विरोधात आंदोलन करणारा मनसेचा कार्यकर्ता नाहक मरण पावला. राज ठाकरेंना किंवा त्यांच्या पक्षाला त्याचे काही देणेघेणे नाही पण एक कुटुंब उघड्यावर पडले. आक्रमक शिवसेनेचे नेतृत्व करताना राज ठाकरें प्रमाणे उध्दव ठाकरेंनी कधी आतातायी पणाची भूमीका घेवून कार्यकर्त्यांना संकटात आणले नाही उलट शिवसेनेसह महाराष्ट्र आपले आजोबा प्रबोधनकार ठाकरें यांचा महाराष्ट्र धर्म जपत पुढे घेवून चालले आहेत म्हणून उध्दव ठाकरे हे राज ठाकरें पेक्षा नेहमीच सरस ठरत आले आहेत. उध्दव ठाकरेंचा हाच संयमीबाणा काल ठाण्यात दिसून आला. कार्यकर्ता मग तो कूणाचाही असो तो जपायला हवा हेच उध्दव ठाकरेंनी दाखवून दिले आहे. त्यामुळे. त्यांची प्रतिमा उंचावली आहे.

**- प्रकाश वाणी, घाटकोपर**

## हिवताप आणि डेंग्यूसाठी घेण्यात आलेले प्रतिबंधात्मक शिबीर यशस्वी

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रा मध्ये सद्यस्थितीत पावसाची येजा सुरु असल्याने हिवताप /डेंग्यु, जलजन्य व साथरोग या आजारांसाठी संवेदनशील आहे. त्याअनुषंगाने नमुंमपा, आरोग्य विभागमार्फत हिवताप /डेंग्यु यासारखे आजाराचा प्रसार रोखणे करीता संपुर्ण नमुंमपा कार्यक्षेत्रात शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे प्रत्यक्ष सर्वेक्षण, नियोजित साप्ताहिक वेळापत्रकानुसार डासळीनाशक फवारणी व रासायनिक धुरीकरण, घरांतर्गत डासउत्पत्ती शोध मोहिमे नियमित स्वरुपात सुरु आहेत. याव्यतीरीक्त नमुंमपा मार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत असतात दिनांक 03/05/2024 व दिनांक 05/08/2024 रोजी विशेष शिबीरांचे आयोजन केले असता नागरीकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला आहे, त्याअनुषंगाने कार्यक्षेत्रात जास्तीच जास्त नागरीकांपर्यंत पोहचुन जणजागृती करणे करीता दि. 12/8/2024 रोजी श्रावणी सोमवारचे औचित्य साधुन 24 नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत विविध ठिकाणी जाहिर शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते.



# ज्या गद्दारीची सुरुवात ठाण्यातून झाली, त्या गद्दारांची तटबंदी ठाण्यातूनच उद्ध्वस्त करा!

- ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे यांची, शिवसैनिकांना साद...
- राजन राजे लिखित, ‘इंडिया एक आयडिया’ पुस्तिकेचं उद्धव ठाकरेंच्या हस्ते दिमाखदार प्रकाशन

**प्रतिनिधी**
■ **ठाणे**

“लोकसभा निवडणुकीनंतर, या संपूर्ण भारतातील सगळ्यात महत्त्वाची निवडणूक कुठली असेल तर, ती आता येऊ घातलेली महाराष्ट्र विधानसभा निवडणूक आहे. लोकसभा निवडणूक तुम्ही-आम्ही पाहिली, ‘इंडिया आघाडी’ म्हणून आपण सगळे एकत्र लढलो. त्यावेळी या सगळ्यांच्या कानाजवळून तीर गेला. इलेक्टोरल बाँड, इलेक्शन कमिशन आणि इडी या सगळ्यांच्या मेहेरबानीमुळे ते फक्त धाराशाही झाले नाहीत, थोडक्यात वाचले; पण, त्यांची लाज गेली. एवढं सगळं करुन आज सगळे राजकीय तज्ज्ञ सांगतायेत की, सत्तर ते ऐंशी जागा यांनी लाटलेल्या आहेत आणि आता, ‘अबकी बार मोदी सरकार’ म्हणणाऱ्यांचा अहंकार धुळीला मिळाला. पण, ते संपलेत असं नव्हे. आपल्याला हे विसरुन चालणार नाही की, या ठाण्यातून दगाफटका झालेला आहे. ठाण्यातूनच सुरत ते गुवाहाटी असं गलिच्छ राजकारण झालेय. काळ्या पैशांतून आमदार विकत घेतले गेले. ज्याला आपण



खोके सरकार म्हणतो, आजही घटनात्मकदृष्ट्या ते बेकायदेशीर आहे. तत्कालीन राज्यपालांचा कारभारही बेकायदेशीरच होता. त्यामुळे ज्या गद्दारीची सुरुवात ठाण्यातून झाली, त्या गद्दारांची तटबंदी येत्या विधानसभा निवडणुकीत ठाण्यातूनच सर्वप्रथम उध्वस्त करा!” असा जोरदार घणाघात करीत, ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे यांनी, ठाण्यातील शिवसैनिकांना साद घातली. शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या माध्यमातून महाराष्ट्रभरात ‘भगवा-सप्ताह’ आयोजित करण्यात आला आहे. यावेळी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार, दि. १० ऑगस्ट-२०२४ रोजी, सायंकाळी ७ वा. घेण्यात आलेल्या सभेत, राजन राजे बोलत होते. यावेळी आपल्या धडाकेबाज भाषणातून, उपस्थित शिवसैनिकांशी संवाद साधताना राजे पुढे म्हणाले की, आपल्या महाराष्ट्रधर्माचा आणि या संपूर्ण सज्जनशक्तीचा, या गद्दारांकडून जो काही अवमान करण्यात आलाय, तो आपल्याला विसरून चालणार नाही. यानिमित्ताने मला आपल्याला एवढंच सांगायचंय, ज्या महाशक्तीच्या इशाऱ्यावर या लोकांनी उद्धवजींचं सरकार पाडलं, त्यांना धडा शिकवायची वेळ आता आलेली आहे आणि ही संधी विधानसभेच्या निवडणुकीत आपल्याला गमावून चालणार नाही. ज्याप्रकारे महाभारतात दुर्योधन आणि दु:शासनाच्या इशाऱ्यावर शकुनी फासे टाकत होता, त्याचपद्धतीने इथे गलिच्छ राजकारणाचे फासे टाकले गेले. इथे मला आवर्जून सांगायचंय की, उद्धवजी ठाकरे महाराष्ट्रात आणि भारतात राहुलजी गांधी हे जे कोदंडधारी धनुष्य हातात घेऊन उभे आहेत, त्यांच्या धनुष्यातून असे शकुनीचे फासे फेकले जात नाहीत तर, त्यांच्या धनुष्यातून तीक्ष्ण बाण रोरावत बाहेर पडतात. ते रामबाण आहेत, अशा शब्दांत राजन राजे यांनी, शिवसैनिकांमध्ये स्फुल्लिंग चेतवले. दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे यांनी, जे काही सलग १८ लेख लिहिले होते, त्या लेखांचा संग्रह असलेल्या ‘इंडिया एक आयडिया’ या पुस्तिकेचं प्रकाशन शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या शुभहस्ते दिमाखात संपन्न झाले. यावेळी गडकरी रंगयातनमध्ये उपस्थित असलेल्या हजारो शिवसैनिकांना या पुस्तिकेचं वाटप करण्यात आले. आगामी विधानसभा विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने, या पुस्तिकेतील प्रासंगिक मुद्द्यांचा संदर्भ घेत, लोकांशी बोलताना, भाषणं करताना आणि मतदारांशी संपर्क साधताना, त्यातील लेख मार्गदर्शक ठरतील, असा आशावाद राजन राजे यांनी, शेवटी बोलून दाखवला.

# कल्याणमध्ये 13 वर्षीय विद्यार्थ्याने संपवलं जीवन

## शिक्षिकेने छळ केल्याचा चिठ्ठीत उल्लेख



**प्रतिनिधी**
■ **कल्याण**

आठवीच्या वर्गात शिकणाऱ्या एका 13 वर्षीय अल्पवयीन विद्यार्थ्याने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना कल्याणमध्ये घडली. रविवारी सायंकाळी 7 वाजेच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. विघ्नेश प्रमोद कुमार पात्रा (वय 13) असं मृत विद्यार्थ्याचं नाव आहे.

धक्कादायक बाब म्हणजे आत्महत्येपूर्वी विघ्नेशने सुसाईट नोटही लिहून ठेवली आहे. यामध्ये शिक्षिकेसह एका मुलाच्या नावाचा उल्लेख करण्यात आलाय. दोघांनी मला चिडवल्याने मी टोकाचं पाऊल उचलत असल्याचं विघ्नेशने सुसाईट नोटमध्ये लिहून ठेवलंय.

घटनेची माहिती मिळताच कोळशेवाडी पोलिसांनी घटनास्थळी धाव विघ्नेशचा मृतदेह ताब्यात घेतला. याप्रकरणी नोंद करत पोलिसांनी पुढील तपास सुरू केलाय. मिळालेल्या माहितीनुसार, मृत विघ्नेश हा आपले वडील प्रमोद कुमार आई आणि बहिणी सोबत कल्याण पूर्वेकडील शिवाजी कॉलनी चिकणीपाडा परिसरातील राहत होता.

विघ्नेश कल्याण पूर्व परिसरातील एका नामांकित शाळेत आठवी इयत्तेत शिक्षण घेत होता. रविवारी त्याचे वडील नेहमीप्रमाणे कामावर गेले. तर आई व बहीण कामानिमित्त घराबाहेर गेल्या होत्या. घरात कुणीही नसल्याने सायंकाळी 7 वाजेच्या सुमारास विघ्नेशने राहत्या घरीच गळफास घेत आत्महत्या केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विघ्नेश जवळ एक सुसाईड नोट सापडली असून त्यामध्ये एका मुलासह शिक्षिकेचा उल्लेख आहे. या दोघांनी चिडवल्यामुळे त्याने आत्महत्या केल्याचे नमूद केल्याचे प्राथमिक माहिती आहे. या घटनेची कोळशेवाडी पोलिसांनी नोंद करत पुढील तपास सुरू केलाय.

# टिटवाळ्यात विवाहितेच्या आत्महत्येप्रकरणी सासू-सासऱ्यांसह तीन जण अटकेत

**प्रतिनिधी**
■ **कल्याण**

हुंड्यासाठी सुनेचा छळ करून तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी टिटवाळा पोलिसांनी सासू, सासरे, दीर, भावजय आणि पती यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे. गेल्या काही महिन्यांपासून सासरच्या मंडळींकडून सुनेचा माहेरहून २० लाख रूपये आण, लग्नात मानपान केला नाही अशा कारणांवरून तिला छळले जात होते.

आरती केतन भांगरे (२५) असे मयत विवाहितेचे नाव आहे. टिटवाळा येथील हरी ओम व्हॅली फेज दोन इमारतीत ती सासरच्या मंडळींसोबत राहत होती. पोलिसांनी सासरा दिनकर काशिनाथ भांगरे, सासू लतिका दिनकर भांगरे, नवरा केतन, दीर गुंजन, जाव मनीषा गुंजन भांगरे यांच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे. आरोपी हे अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील एकदरा गावातली मूळ रहिवासी आहेत. विवाहितेचा भाऊ जनार्दन घारे यांनी याप्रकरणी टिटवाळा पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. घारे कुटुंब हे इगतपुरी जवळील काळुस्ते गावी राहते.

पोलिसांनी सांगितले, गेल्या वर्षी आरतीचा विवाह केतन याच्या बरोबर झाला होता. आरती ही मूळची नाशिक भागातील आहे. विवाहानंतर काही दिवसांनी सासरच्या मंडळींनी आरतीला टोमणे मारण्यास सुरूवात केली होती. विवाहात आमचा मानपान केला नाही. नवीन घरासाठी माहेरहून २० लाख रूपये आण. तुला चांगला स्वयंपाक करता येत नाही, अशाप्रकारे आरतीला दररोज त्रास दिला जात होता.

# केडीएमसीच्या 27 गावातील कर्मचाऱ्यांचे काम बंद

## मुख्यालयावर मोर्चा काढत दिला इशारा

**प्रतिनिधी**
■ **कल्याण**

कल्याण- डोंबिवली महापालिका क्षेत्रातील २७ गावांमधील सफाई कामगारानी आक्रमक पवित्रा घेतला आहे. केडीएमसीच्या सेवेत समाविष्ट करून घेण्याच्या मागणीसाठी केडीएमसीमधील २७ गावातील सफाई कर्मचाऱ्यांनी महानगर सफाई कर्मचारी संघ , शिवसेना शहरप्रमुख महेश गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली आज काम बंद धरणे आंदोलन केले. तसेच केडीएमसी मुख्यालयावर मोर्चा काढत मागण्या मान्य न झाल्यास महापालिका अधिकाऱ्यांना घराबाहेर पडू देणार नाही, तसेच महापालिकेच्या कार्यालयांना टाळे ठोकू असा इशारा केडीएमसीला दिला.




महानगर सफाई कर्मचारी संघ, शिवसेना शहर प्रमुख महेश गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली २७ गावातील शेकडो कामगारांनी आपल्या मागण्यांसाठी केडीएमसी मुख्यालयावर मोर्चा काढला. यावेळी आंदोलनकर्त्या कर्मचाऱ्यांनी महापालिके विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. कल्याण- डोंबिवली महापालिकेलगतची २७ गावे १ जून २०१५ रोजी महापालिकेत समाविष्ट करण्यात आली. या गावातील ग्रामपंचायतीच्या वास्तू महापालिकेत समाविष्ट करण्यात आल्या. मात्र अद्यापही ग्रामपंचायतमधील कामगारांचा प्रश्न प्रलंबित आहे.

# ‘हर घर तिरंगा‘ अभियानाअंतर्गत पालिकेतर्फे अनेकविध कार्यक्रमांचे आयोजन !

**प्रतिनिधी**
■ **कल्याण**

शासनाच्या निर्देशानुसार "हर घर तिरंगा" म्हणजेच "घरोघरी तिरंगा" या अभियानाची अंमलबजावणी महापालिका परिक्षेत्रात सर्वत्र करण्याबाबत आदेश महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी दिले आहेत. त्याअनुषंगाने महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, नोडल अधिकारी धैर्यशील जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेमार्फत अनेकविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये दि. 09 ऑगस्ट 2024 रोजी "ऑगस्ट क्रांती" दिनाचे औचित्य



साधून महापालिका क्षेत्रातील सैन्य, नौदल व वायुदलातील माजी ज्येष्ठ अधिका-यांचा तसेच अग्निशमन दलातील कर्तव्यावर असताना शहीद झालेल्या कर्मचा-यांच्या आप्तेष्टांचा महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांचे हस्ते सन्मान करण्यात आला. महापालिका परिक्षेत्रातील शालेय विद्यार्थ्यांना तसेच पालकांना महापालिकेच्या सहा.आयुक्त व अधिक्षकांमार्फत ध्वज वितरण करण्यात आले. महापालिकेच्या तसेच खाजगी शाळांमधील विद्यार्थ्यांमार्फत "तिरंगा प्रतिज्ञा" घेण्यात आली. महापालिकेच्या शिक्षण विभागामार्फत उद्या दि. 13 ऑगस्ट 2024 रोजी "हर घर तिरंगा" म्हणजेच "घरोघरी तिरंगा" या विषयाबाबत चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दि. 14 ऑगस्ट 2024 रोजी शाळा-शाळांतून रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

# दिवा स्थानकादरम्यान प्रवासी लोकलमधून पडून गंभीर जखमी

■ **दिवा**

मध्य रेल्वेच्या डोंबिवली जवळील कोपर ते दिवा रेल्वे स्थानकांच्या दरम्यान सोमवारी सकाळी छत्रपती शिवाजी टर्मिनसकडे जाणाऱ्या, प्रवाशांनी खचाखच भरलेल्या लोकलमधील दरवाजात उभा असलेला एक प्रवासी रेल्वे मार्गात पडून गंभीर जखमी झाला आहे. कोपर आणि दिवा रेल्वे स्थानकांच्या दरम्यान ही दुर्घटना घडली. एक प्रवासी लोकलमधून पडल्याची माहिती गार्डने मोटरमनला देताच. काही क्षण तेथे लोकल थांबवून काही प्रवाशांना पडलेल्या प्रवाशाला मदत करण्यासाठी तेथे उतरण्यास सांगण्यात आले. पडलेल्या प्रवाशाच्या डोक्याला सर्वाधिक मार लागल्याने त्याच्या डोक्यातून रक्तस्राव सुरू होता. तो बेशुध्दावस्थेत होता. पाच प्रवाशांनी त्याच्यावर प्राथमिक उपचार केले. दिवा आणि कोपर दोन्ही रेल्वे स्थानके अपघात स्थळापासून दूर होती. त्यामुळे या प्रवाशांनी डोंबिवलीकडून येणाऱ्या एका लोकलला हात केला. काही क्षण प्रवासी पडल्याच्या ठिकाणी थांबविण्यात आली.

# श्री गणेश मंदिराला 30 किलो चांदीचे दान

■ **डोंबिवली**

डोंबिवलीतील फडके रस्त्यावरील श्री गणेश मंदिराच्या गर्भगृह नुतनीकरणाच्या कामासाठी नांदेड येथील वारकरी संप्रदायाचा वारसा असलेल्या घराण्यातील युवा उद्योजक सुमित मोगरे यांनी शनिवारी ३० किलो ९०० ग्रॅम वजनाची चांदीची वीट श्री गणेश मंदिर संस्थानला दान दिली. बाजारभावाप्रमाणे या चांदीची किंमत २५ लाख रूपये आहे. गेल्या वर्षभरापासून श्री गणेश मंदिरातील गर्भगृहाच्या नुतनीकरणाचे काम मंदिर संस्थानकडून सुरू आहे.

# अखेर यशश्री शिंदेचा गहाळ मोबाइल सापडला

## डेटा मिळवण्यासाठी लॅबला पाठवला, खळबळजनक खुलासे होण्याची शक्यता

**प्रतिनिधी**
■ **उरण**

उरणमधील यशश्री शिंदेच्या हत्येप्रकरणी मोठी अपडेट समोर आली आहे. मृत यशश्री शिंदेचा गहाळ मोबाईल अखेर पोलिसांच्या हाती लागला आहे. उरणमधील हत्याकांडात यशश्रीचा मोबाईल हा अत्यंत महत्त्वाचा पुरावा मानला जात होता. मात्र तिच्या मृत्यूपासून तिचा मोबाईल सापडलेला नव्हता. मात्र आता अखेर तो मोबाईल पोलिसांना सापडला आहे. यामधून अनेक खळबळजनक खुलासे होण्याची शक्यता आहे.

यशश्री शिंदेच्या हत्येनंतर आरोपी दाऊद शेखला पोलिसांनी कर्नाटकच्या गुलबर्गामधून अटक केली होती. सध्या तो पोलिस कोठडीतच आहे. त्याला अटक झाल्यानंतर त्याची प्राथमिक चौकशी केली तेव्हा त्याने यशश्रीची हत्या केल्याची कबुली दिली होती. त्याच्यावर पोलिसांकडून अ‍ॅट्रॉसिटीच्या कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, त्याला 13 ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

पोलिस चौकशीमध्ये गेल्या पाच वर्षांपासून आमच्या दोघांमध्ये मोबाईलदद्वारे संपर्क होता, अशी कबुली अटकेनंतर दाऊद शेखने दिली होती. तेव्हापासूनच हा मोबाईल या प्रकरणातील तपासाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात होता. मात्र मोबाईल गहाळ असल्याने पोलिसांकडे ठोस असा पुरावा नव्हता. आता यशश्रीचा मोबाईल सापडल्यामुळे पोलिसांना या प्रकरणाचा तपास करणं आता आणखी सोपं होणार आहे.

# पनवेल पालिकेच्यावतीने गणेशोत्सव नियोजन बैठक

## विविध विषयांवरती चर्चा

**प्रतिनिधी**
■ **पनवेल**

सार्वजनिक गणेशोत्सव व्यवस्थितरीत्या उत्साहात संपन्न होण्याकरिता संवाद व नियोजन करण्याच्या हेतूने मा. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात दिनांक 12 ऑगस्ट रोजी बैठक घेण्यात आली. यावेळी पनवेल महानगरपालिकेच्यावतीने गणेशोत्सवासाठी गणेश मंडळांना ऑनलाईन पध्दतीने परवाना देण्यात येणाऱ्या सुविधेची माहितीसह प्रात्यक्षिकासह सादर करण्यात



आली.तसेच पर्यावरणपूरक गणेशोत्सव,सजावट गणेश स्पर्धा यावषियी माहिती देण्यात आली तसेच पोलिस विभागाच्यावतीने विविध सूचना देण्यात आल्या.

यावेळी आयुक्त मंगेश चितळे, उपायुक्त बाबासाहेब राजळे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त संतोष वारूळे, ,सहाय्यक पोलिस आयुक्त अशोक राजपूत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक तसेच महापालिका अधिकारी, सिडको, पोलिस विभाग, विद्युत वितरण,तहसिल,गणेश मंडळांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

महाराष्ट्र शासन, गृह विभाग (बंदरे व परिवहन)
**महाराष्ट्र सागरी मंडळ**
सागरी अभियंता व चिफ सर्व्हेअर
इंडीयन मर्कटाईल चेंबर्स, तिसरा मजला, रामजीभाई कमानी मार्ग, बेलाई पिअर, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.: ०२२-२६२३९९४५. फॅक्स क्र. ०२२-२६२३११२५
Website : https.nalamb.maharashtra.gov.in Email mecs.mumbai@mmb.maharashtra.gov.in

**द्वितीय ई - निविदा सूचना (सन २०२४ - २०२५)**
Main Portal : https://mahatenders.gov.in
Department Portal : www.mahammb.maharashtra.gov.in

महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई मार्फत "Lease of MMB owned Cutter Suction Dredger CSD Swami for 03 years further extendable by 02 more years (Bareboat Charter) " या कामासाठी ई - निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | इसारा रक्कम (रु.) | कोऱ्या निविदेची किंमत (रु.) |
|---|---|---|---|
| १. | Lease of MMB owned Cutter Suction Dredger CSD Swami for 03 years further extendable by 02 more years (Bareboat Charter) | ९९,००० /- | १,१८०/- |

तपशीलवार अटी व शर्ती पाहण्यासाठी तसेच कोरा निविदा फॉर्म डाऊनलोड करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा पोर्टल https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १०/०८/२०२४ रोजी ११.०० वा. पासून उपलब्ध होतील. कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे.

सही/-
सागरी अभियंता व चिफ सव्हेअर,
महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई.

डी.जी.आय.पी.आर/आरओसी२०२४-२५/क्र.५/सी१८७७

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**बी. वाय. एल. नायर चॅरि. हॉस्पिटल**
**डॉ. ए. एल. नायर रोड, मुंबई सेंट्रल, मुंबई - 400 008**
**क्र. एनएसजी/ 440 दिनांक : 12.08.2024**

**लघु ई-निविदा सूचना**

| अनु क्र. | वर्णन |
|---|---|
| 1. | बी. वाय. एल. नायर चॅरि. हॉस्पिटल करीता ग्लोव्हज सुपिरियर क्वालिटी सामान्य वापर ग्रॅन्युअल सरफेस लेटेक्स ग्लोव्हज आकार 6.5 ची खरेदी करणे. **एनजीएस/ 427 (महाटेंडर आयडी क्र. 2024_एमसीजीएम_1068308_1)** |
| 2. | बी. वाय. एल. नायर चॅरि. हॉस्पिटल करीता ग्लोव्हज सुपिरियर क्वालिटी सामान्य वापर ग्रॅन्युअल सरफेस लेटेक्स ग्लोव्हज आकार 7 ची खरेदी करणे. **एनजीएस/ 428 (महाटेंडर आयडी क्र. 2024_एमसीजीएम_1068338_1)** |
| 3. | बी. वाय. एल. नायर चॅरि. हॉस्पिटल करीता ग्लोव्हज सुपिरियर क्वालिटी सामान्य वापर ग्रॅन्युअल सरफेस लेटेक्स ग्लोव्हज आकार 7.5 ची खरेदी करणे. **एनजीएस/ 429 (महाटेंडर आयडी क्र. 2024_एमसीजीएम_1068350_1)** |
| 4. | बी. वाय. एल. नायर चॅरि. हॉस्पिटल करीता ग्लोव्हज सुपिरियर क्वालिटी सामान्य वापर ग्रॅन्युअल सरफेस लेटेक्स ग्लोव्हज आकार 8 ची खरेदी करणे. **एनजीएस/ 430 (महाटेंडर आयडी क्र. 2024_एमसीजीएम_1068363_1)** |
| 5. | बी. वाय. एल. नायर चॅरि. हॉस्पिटल करीता हॉलो फायबर डायलिझर 1.3 मेम्ब्रेनची खरेदी करणे. **एनजीएस/ 421 (महाटेंडर आयडी क्र. 2024_एमसीजीएम_1067822_1)** |
| 6. | बी. वाय. एल. नायर चॅरि. हॉस्पिटल करीता कॉम्प कचऱ्याच्या पिशव्या - काळ्या ची खरेदी करणे. **एनजीएस/ 425 (महाटेंडर आयडी क्र. 2024_एमसीजीएम_1068116_1)** |
| 7. | बी. वाय. एल. नायर चॅरि. हॉस्पिटल करीता कॉम्प कचऱ्याच्या पिशव्या - लाल ची खरेदी करणे. **एनजीएस/ 424 (महाटेंडर आयडी क्र. 2024_एमसीजीएम_1068279_1)** |
| 8. | बी. वाय. एल. नायर चॅरि. हॉस्पिटल करीता कॉम्प कचऱ्याच्या पिशव्या - पिवळ्या ची खरेदी करणे. **एनजीएस/ 422 (महाटेंडर आयडी क्र. 2024_एमसीजीएम_1068080_1)** |
| 9. | बी. वाय. एल. नायर चॅरि. हॉस्पिटल करीता कॉम्प कचऱ्याच्या पिशव्या - निळ्या ची खरेदी करणे. **एनजीएस/ 423 (महाटेंडर आयडी क्र. 2024_एमसीजीएम_1068019_1)** |
| 10. | बी. वाय. एल. नायर चॅरि. हॉस्पिटल करीता कॉम्प कचऱ्याच्या पिशव्या - हिरव्या ची खरेदी करणे. **एनजीएस/ 426 (महाटेंडर आयडी क्र. 2024_एमसीजीएम_1068260_1)** |
| 11. | बी. वाय. एल. नायर चॅरि. हॉस्पिटल करीता ओटी निर्जंतुक ग्लोव्हज आकार 6.5 ची खरेदी करणे. **एनजीएस/ 431 (महाटेंडर आयडी क्र. 2024_एमसीजीएम_1068416_1)** |
| 12. | बी. वाय. एल. नायर चॅरि. हॉस्पिटल करीता ओटी निर्जंतुक ग्लोव्हज आकार 7 ची खरेदी करणे. **एनजीएस/ 432 (महाटेंडर आयडी क्र. 2024_एमसीजीएम_1068431_1)** |
| 13. | बी. वाय. एल. नायर चॅरि. हॉस्पिटल करीता ओटी निर्जंतुक ग्लोव्हज आकार 7.5 ची खरेदी करणे. **एनजीएस/ 433 (महाटेंडर आयडी क्र. 2024_एमसीजीएम_1068406_1)** |
| 14. | बी. वाय. एल. नायर चॅरि. हॉस्पिटल करीता स्टे. डिझी. हायपोडर्मिक प्लास्टिक सिरींग्ज 10 सीसी विदआउट लेउर लॉक ची खरेदी करणे. **एनजीएस/ 436 (महाटेंडर आयडी क्र. 2024_एमसीजीएम_1068418_1)** |
| 15. | बी. वाय. एल. नायर चॅरि. हॉस्पिटल करीता स्टे. डिझी. हायपोडर्मिक प्लास्टिक सिरींग्ज 20 सीसी एसएन विदआउट लेउर लॉक ची खरेदी करणे. **एनजीएस/ 437 (महाटेंडर आयडी क्र. 2024_एमसीजीएम_1068479_1)** |
| 16. | बी. वाय. एल. नायर चॅरि. हॉस्पिटल करीता स्टे. डिझी. हायपोडर्मिक प्लास्टिक सिरींग्ज 2 सीसी विदआउट लेउर लॉक ची खरेदी करणे. **एनजीएस/ 434 (महाटेंडर आयडी क्र. 2024_एमसीजीएम_1068476_1)** |
| 17. | बी. वाय. एल. नायर चॅरि. हॉस्पिटल करीता स्टे. डिझी. हायपोडर्मिक प्लास्टिक सिरींग्ज 5 सीसी सीएन विथ लेउर लॉक ची खरेदी करणे. **एनजीएस/ 435 (महाटेंडर आयडी क्र. 2024_एमसीजीएम_1068860_1)** |
| 18. | बी. वाय. एल. नायर चॅरि. हॉस्पिटल करीता स्टे. डिझी. हायपोडर्मिक प्लास्टिक सिरींग्ज 50 सीसी सीएन विथ लेउर लॉक ची खरेदी करणे. **एनजीएस/ 438 (महाटेंडर आयडी क्र. 2024_एमसीजीएम_1068855_1)** |

https://portal.mcgm.gov.in आणि https://mahatenders.gov.in
श्रीम. प्रीती एस. जोशी (जनरल स्टोअर)
दूर. क्र. 022- 23027135
**ई-मेल आयडी :** hc01.genstore.bylnair@mcgm.gov.in

पीआरओ/९३०/जाही/२०२३-२४
झाडे लावा, झाडे जगवा

सही/-
अधिष्ठाता
बि. वाय. एल. नायर चॅरि. हॉस्पिटल

## ग्रामपंचायतीच्या विकास कामात अडीच कोटींचा घोटाळा

**बुलढाणा :** बुलढाणा तालुक्यातील चांडोल ग्रामपंचायतीला १४ वित्त आयोगाचा कोट्यावधीचा निधी प्राप्त झाला होता. मात्र या निधीत कोणत्याही प्रकरणी विकास कामे न करता संपूर्ण निधी काढून घेत घोटाळा करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. हा घोटाळा एका नागरिकाने केलेल्या चौकशीत समोर आला आहे. या प्रकरणी आता राज्याच्या मुख्य सचिवांकडे न्यायाची मागणी करण्यात आली आहे. बुलढाणा तालुक्यातील चांडोल ग्रामपंचायतीसाठी मिळालेला १४ वित्त आयोगाचा निधी गावातील जलजीवन मिशनचे कामे, रस्ते, पूल नाल्या आदी विकासाचे व मूलभूत सुविधाचे कामांकरिता वापरायचा होता. मात्र प्रत्यक्षात कामे कुठेच झाल्याचे दिसत नसल्याने स्थानिक नागरिकाने कसून चौकशी केली. यात काम करणारी यंत्रणा ही बोगस दाखवून व कुठलेही विकास कामे न करता पूर्णतः बिले काढून गैरव्यवहार झाल्याचा आरोप स्थानिक नागरिक दुर्गाप्रसाद चांदा यांनी ऑनलाईन काढलेल्या पुरव्यावरून केला आहे. त्याची तक्रार जिल्हाधिकारी व अमरावती आयुक्त यांच्याकडे केली असून जिल्हा परिषद बुलढाणा यांच्याकडे सुनावणी करण्यासाठी वर्ग केले आहे.



# पुनर्बांधणीमध्ये कमिशनचा घोळ झाल्यास मी तुमच्या अंगावर येईन

### सर्वपक्षीय बैठकीत संभाजीराजेंनी पालकमंत्र्यांना खडसावले

**प्रतिनिधी**
■ **कोल्हापूर**

केशवराव भोसले नाट्यगृहाच्या पुनर्बांधणीसाठी आज खासदार शाहू छत्रपती यांनी सर्वपक्षीय बैठक बोलावली. या बैठकीमध्ये माजी खासदार संभाजी राजे लेस आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं त्यांनी पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे हातवारे करत या पुनर्बांधणीमध्ये कमिशनचा घोळ झाल्यास सर्वात आधी मी तुमच्या अंगावर येईल, अशा शब्दात दम भरला.



ही बैठक शाहू छत्रपती यांनी बोलावले असली तरीही कामात कोणताही गैरप्रकार झाल्यास मी यासाठी तुम्हालाच जबाबदार धरणार असे संभाजीराजे यांनी हसन मुश्रीफ यांना सुनावलं. संभाजीराजे छत्रपती यांचा अचानक झालेला हा रुद्रावतार पाहून उपस्थित सर्वच अवाक झालेत. हसन मुश्रीफ यांनी मात्र या सगळयावर कोणतीही प्रतिक्रिया न देता शांत राहणं पसंत केलं.

काही दिवसापूर्वीच विशाळगडमध्ये झालेल्या हिंसाचार प्रकरणावरून पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी संभाजी राजे यांच्यावर नाराजी व्यक्त केली होती. यावर प्रतिक्रिया देताना संभाजी राजे यांनी देखील हसन मुश्रीफ यांनी मला पुरोगामीत्व शिकवू नये, अशा शब्दात मुश्रीफांना फटकारलं होतं. विशाळगड प्रकरणानंतर आता केशवराव भोसले नाट्यगृह पुनर्बांधणीच्या निमित्ताने देखील संभाजी राजे आणि हसन मुश्रीफ वाद वाढत असल्याच्या चर्चा या निमित्ताने कोल्हापुरात रंगल्या..

दरम्यान कोल्हापुरातील संगीत सूर्य केशवराव भोसले नाट्यगृहाला भीषण आग लागली होती. या आगीमध्ये संपूर्ण नाट्यगृह जळून भस्मसात झाले आहे. नाट्यगृहाची पुनर्बांधणी करण्यासाठी आज कोल्हापूरचे खासदार शाहू महाराज छत्रपती यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत पूर्वीप्रमाणेच संगीत सूर्य केशवराव भोसले नाट्यगृह उभारले जावं अशी मागणी करण्यात आली.

कोल्हापुरातील ऐतिहासिक संगीत सूर्य केशवराव भोसले नाट्यगृहाला आग लागल्यानंतर त्याची पुनर्बांधणी करण्यासाठी कोल्हापूरकर सज्ज झालेले आहेत. राज्य शासनाने 20 कोटी रुपये जाहीर केले असून हे नाट्यगृह उभारणीसाठी आता कोल्हापुरातील सर्वपक्षीय नेते एकत्र आलेले आहेत. आज कोल्हापुरातील सर्किट हाऊस इथं कोल्हापूरचे खासदार शाहू महाराज छत्रपती यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय नेत्यांची बैठक झाली. या बैठकीमध्ये नाट्यगृहाच्या पुनर्बांधणी संदर्भात विचार विनिमय करण्यात आले.

# अण्णाभाऊंना भारतरत्न मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार

### 'अण्णा भाऊ दी अपहोल्डर दलित अँड विमेन लिटरेचर' पुस्तकाचे प्रकाशन

**प्रतिनिधी**
■ **पुणे**

मराठी प्रसिद्ध साहित्यिक पानिपतकार विश्वास पाटील यांनी लिहलेल्या अण्णा भाऊ साठे यांच्यावरील "अण्णा भाऊ दि अपहोल्डर दलित अँड विमेन लिटरेचर" या चरित्र ग्रंथाचा इंग्रजी व हिंदी अनुवाद असलेल्या पुस्तकाचे प्रकाशन शरद पवार यांच्या शुभहस्ते बालगंधर्व रंगमंदिर येथे करण्यात आले. अण्णा भाऊंना भारतरत्न पुरस्कार मिळवून देण्यासाठी प्रयत्न करेन असे मत यावेळी जेष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष साहित्यिक डॉ. रावसाहेब कसबे प्रमुख उस्थिती भाजपचे राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे, साहित्य



अकादमीचे सचिव डॉ. श्रीनिवास राव, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रतनलाल सोनग्रा, सावित्रीच्या लेकी अध्यक्षा मंजिरी घाडगे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष भगवानराव वैराट हे होते. प्रास्ताविक भगवानराव वैराट म्हणाले की अण्णा भाऊंना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार प्रदान करण्यात यावा. अण्णा भाऊंचे साहित्य क्षेत्रातील योगदान वाखाणण्याजोगे आहे. अशा लोकशाहीर होणे नाही.

पवार म्हणाले की पाटील यांनी मराठीत लिहिलेल्या "अण्णाभाऊंची दर्दभरी दास्तान" या चरित्र ग्रंथांची देशपातळीवर साहित्यिक वर्तुळात मोठ्या प्रमाणावर नोंद घेतली गेली आहे. राजहंस प्रकाशनने मराठीत प्रकाशित केलेल्या या ग्रंथाच्या तीन आवृत्या आधीच प्रकाशित झालेल्या आहेत. दिल्लीच्या प्रसिद्ध वाणी प्रकाशनने नुकताच हा ग्रंथ हिंदीमध्येही प्रकाशित केलेला आहे.

## जायकवाडी धरणातील पाणीसाठ्यात वाढ

■ **संभाजीनगर**

दुष्काळाने तहानलेल्या मराठवाड्यातील नागरिकांसाठी आनंदाची बातमी आहे. जायकवाडी धरणातील पाणीसाठा झपाट्याने वाढ झाली आहे. गेल्या आठवडाभरात धरणाचा पाणीसाठा तब्बल 10 ते 12 टक्क्यांनी वाढला आहे. त्यामुळे मराठवाड्यातील बऱ्याच शहरांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला आहे.मागील आठवड्यात नाशिक जिल्ह्यात मुसळधार पाऊस झाला होता. यामुळे नद्या-नाल्यांना मोठा पूर आला. परिणामी नाशिकला पाणीपुरवठा करणाऱ्या गंगापूर धरणात तब्बल 85.33 टक्के इतका जलसाठा जमा झाला. त्याचबरोबर काश्यपीत 58 टक्के, गौतमी गोदावरीत 90, आळंदीत 91 टक्के आणि पालखेड धरणात 68 टक्के पाणी जमा झालं. धरणातील पाणीसाठा झपाट्याने वाढल्याने गोदावरी नदीत पाण्याचा विसर्ग करण्यात आला. या काळात नांदूरमध्यमेश्वर धरणातून गोदावरी नदीत करण्यात आलेला पाण्याचा विसर्स 54 हजार क्युसेकवर पोहोचला होता. त्यामुळे जायकवाडी धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ झाली. परंतु, मंगळवारनंतर पुन्हा पावसाने उसंत घेतली.अधूनमधून रिपरिप होत असली तरी पावसाचा जोर कमी झाला. याचा परिणाम जायकवाडीकडे धरणाकडे झेपावणाऱ्या पाण्यावर झाला. सध्या नांदूरमध्यमेश्वरचा विसर्ग सध्या 5 हजार क्युसेकवर आला आहे. यामध्ये दारणा धरणातून 2001, भावली 208, कडवा 413, गंगापूर 951 क्युसेकने पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

## ट्रक-आशयर टेम्पोच्या धडकेत दोघांचा होरपळून मृत्यू, दोघे गंभीर

**प्रतिनिधी**
■ **सातारा**

सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यात आज सोमवारी पहाटे साडेतीन वाजेच्या सुमारास भीषण अपघात झाला. भरधाव वेगात जाणाऱ्या ट्रकने आयशर टेम्पोला जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता, की दोन्ही वाहनांनी पेट घेतला. या घटनेत दोघांचा जागीच मृत्यू तर दोघे गंभीर जखमी झाले.

अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमींना उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आलंय. यातील एकाची प्रकृती



चिंताजनक असल्याचं बोललं जातंय. मृतांची नावे अद्याप समोर आलेली नाही.

घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, कोरेगाव तालुक्यातील अंबवडे संमत वाघोली येथे हा अपघात झाला. भरधाव कंटेनगर समोरून येणाऱ्या आयशर टेम्पोला धडकला. अपघात इतका भीषण होता, की कंटेनरने पेट घेतला. तर आशयरच्या समोरील भागाचा देखील चक्काचूर झाला.

## नागपुरातील ड्रग्ज फॅक्टरीवर डीआरआयची छापेमारी

### 78 कोटी रुपयांचे एमडी ड्रग्ज जप्त

**प्रतिनिधी**
■ **नागपूर**

नागपूरच्या पाचपावली परिसरातून ड्रग्स फॅक्टरीचा पर्दाफाश करत महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) ७८ कोटी रुपयांचा एमडी ड्रग्जचा साठा जप्त केला आहे. डीआरआयच्या छापा कारवाईत द्रव्य स्वरूपातील 52 किलो एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आलं आहे. महसूल गुप्तचर संचालनालयाची ही कारवाई नागपूरच्या पाचपावली परिसरात करण्यात आली आहे. या प्रकरणी मास्टरमाईंड आणि त्याच्या अन्य तीन साथीदारांना डीआरआयने अटक केली आहे.

नागपूर शहरातील पाचपावली परिसरात एक बांधकामाधीन इमारतीत मेफेड्रोनचे (एमडी) गुप्तपणे उत्पादन होत आहे, अशी माहिती 'डीआरआय'ला मिळाली



होती. त्यावरून 10 ऑगस्ट रोजी डीआरआयकडून छापेमारीची मोहीम राबविण्यात आली. मेफेड्रोनच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेली सर्व रसायने, साहित्य आणि यंत्रसामग्रीने सुसज्ज असलेली एक छोटी प्रयोगशाळा पाचपावली परिसरात एक बांधकामाधीन इमारतीत उभारण्यात आल्याचं छापेमारीदरम्यान समोर आले. मास्टरमाइंडनं प्रथम यंत्रसामग्रीचा संपूर्ण संच खरेदी केला. त्यानंतर सेटअप केला. 100 किलोपेक्षा जास्त मेफेड्रोन तयार करण्याची क्षमता असलेला कच्चा मालदेखील आरोपींनी जमा केला होता.

सिंडिकेटनं आधीच द्रव स्वरूपात 50 किलोपेक्षा जास्त मेफेड्रोन तयार केले होते. क्रिस्टलाइज्ड तसेच पावडर स्वरूपात उत्पादन बाहेर आणण्यासाठी त्यावर पुढील प्रक्रिया सुरू होती.

## विदर्भ-मराठवाड्यात आज मुसळधार पावसाची शक्यता

### हवामान खात्याकडून तब्बल 6 जिल्ह्यांना अलर्ट

**प्रतिनिधी**
■ **नागपूर**

जुलै महिन्यात धो-धो बरसणाऱ्या पावसाने ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीपासूनच राज्यात काहीशी विश्रांती घेतली. बऱ्याच जिल्ह्यांमध्ये पावसाने उघडीप दिली असली तरी काही ठिकाणी अजूनही पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी पडत आहे. हवामान विभागाने आज सोमवारी विदर्भासह मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना पावसाचा इशारा दिला आहे.

विदर्भात तुरळक ठिकाणी आज विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाची शक्यता आहे. तर मराठवाड्यातील तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज आहे. दुसरीकडे उत्तर महाराष्ट्रात विजांसह पावसाची शक्यता असून, उर्वरित राज्यात पावसाची उघडीप राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

आयएमडीने जारी केलेल्या अंदाजानुसार, सध्या ईशान्य राजस्थान आणि परिसरावर ७.६ किलोमीटर उंचीवर चक्राकार वाऱ्यांच्या स्थिती आहे. मान्सूनचा आस ईशान्य बंगालच्या उपसागरापर्यंत सक्रिय आहे. त्यामुळे महाराष्ट्रापासून ते कर्नाटकपर्यंत कमी दाबाचा पट्टा विरून गेला आहे.

## निष्ठावान कार्यकर्त्यांच्या भेटीला राज ठाकरे

### मनसे नेते दिलीप धोत्रेंच्यावतीने पुणे येथे स्नेह मेळाव्याचे आयोजन

**प्रतिनिधी**
■ **सोलापूर**

पंढरपुरातील मनसेचे नेते दिलीप धोत्रे यांनी वाढदिवसाचे औचित्य साधून पुणे येथे मित्रांचा स्नेहमेळावा आयोजित केला होता. निष्ठावान कार्यकर्त्याला भेटण्यासाठी अचानकपणे राज ठाकरे यांनी या स्नेह मेळाव्यास उपस्थिती लावली आणि त्यांच्या मित्रांची अनेक दिवसांपासूनची इच्छा पूर्ण झाल्याने त्यांचा आनंद द्विगुणित झाला. यावेळी त्यांच्या मित्रांकडून त्यांना आता आमदारच अशी लिहिलेली एक प्रतिमा भेट घेऊन शुभेच्छा देण्यात आल्या.

मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी एक नेता, एक झेंडा घेऊन राजे ठाकरे यांची प्रेरणा डोळयासमोर



ठेवून १९९२ साली मित्रांना बरोबर घेऊन कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात भारतीय विद्यार्थीसेनेची स्थापना केली. यानंतर महाविद्यालयात झालेल्या सीआर पदाच्या निवडणुकीत दिलीप धोत्रे हे विजयी झाले. धोत्रे हे एक नेता एक झेंडा घेऊन प्रेरणास्थान राज ठाकरे यांना मानत असल्याने राज ठाकरे यांना महाविद्यालयीन जीवनापासून त्यांच्यासोबत असलेल्या मित्रांना राज ठाकरे यांना भेटण्याची इच्छा होती. मात्र विविध कारणामुळे भेट झाली नाही. दरम्यान दिलीप धोत्रे यांनी राजकीय प्रवासाला सुरुवात केली. मनसेचे सोलापूर जिल्ह्यात काम चांगले असल्याने राज ठाकरे यांच्याबरोबर त्यांचा अनेकवेळा याविषयी संबंध आला; मात्र त्यांच्या मित्र मंडळींना राज ठाकरे यांना भेटण्याची इच्छा अधुरी राहिली होती. ही इच्छा पूर्ण करण्यासाठी दिलीप धोत्रे यांनी पुणे येथे पंढरपुरातील मित्रांचा स्नेहमेळावा आयोजित केला.

## नाशिकमध्ये मनोज जरांगेंच्या शांतता रॅलीचा समारोप

### शहरातील सर्व शाळांना सुट्टी जाहीर

**प्रतिनिधी**
■ **नाशिक**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे राज्यभर शांतता रॅली काढत आहेत. त्यांच्या शांतता रॅलीचा मंगळवारी (१३ ऑगस्ट) नाशिकमध्ये समारोप होणार आहे. या पार्श्वभूमीवर नाशिकमधील सर्व शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. त्याशिवाय शहरातील वाहतुकीतही मोठे बदल करण्यात आले आहे.

मनोज जरांगे यांच्या शांतता रॅली आणि सभेच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहरातील सर्व माध्यमिक,



उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना उद्या सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. मनोज जरांगे यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने निर्णय घेतला आहे. मनोज जरांगे यांच्या रॅली आणि सभेला मोठ्या प्रमाणात मराठा समाज बांधव येण्याची शक्यता असल्याने शालेय विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी निर्णय घेण्यात आल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आलेय.

नाशिकमध्ये मनोज जरांगे पाटील यांच्या शांतता रॅलीचा समारोप होणार आहे. त्यासाठी मराठा आंदोलकांनी जोरदार तयारी केली. नाशिमधीलसीबीएस येथे मनोज जरांगे पाटलांची जंगी सभा होणार आहे. शांतता रॅलीच्या समारोपाच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहरात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त असणार आहे.




*पुणे : पुणे शहर व जिल्ह्यातील ओ बी सी विभाग कार्यकर्ता मेळावा व पद नियुक्ती कार्यक्रमात उपस्थित खासदार चंद्रकांत हांडोरे , कॅप्टन अजसिंग यादव राष्ट्रीय ओ बी सी विभाग प्रमुख, पुणे शहर अध्यक्ष शिंदे, माजी महापौर माजी आमदार दिपती चौधरी, माजी मंत्री बागवे व असंख्य कार्यकर्ते पुणे काँग्रेस कार्यालय उपस्थित होते.*

## ‘ई पॉझ‘मशीनच्या तांत्रिक बिघाडामुळे लाभार्थी स्वस्त धान्यापासून वंचित

### दोन महिन्यांपासून अडचण

**प्रतिनिधी**
■ **बीड**

रेशन कार्ड धारकांना धान्य वाटप करताना त्यांच्या बोटाचे ठसे घेण्यासाठी प्रत्येक रेशन दुकानदारास ई-पॉझ मशीन देण्यात आले आहे. मात्र हे ई- पोझ मशीनमधील तांत्रिक अडचणीमुळे बीड जिल्ह्यातील अनेक लाभार्थ्यांना स्वस्त धान्यापासून वंचित राहावे लागत आहे. यामुळेच स्वस्त धान्य दुकानदार आणि ग्राहक यांच्यात



वाद देखील होत आहेत.

रेशन दुकानावर देण्यात आलेल्या ई-पॉझ मशीनच्या माध्यमातून ग्राहकांना स्वस्त धान्य पुरवले जाते. मात्र या मशीनमधील तांत्रिक बिघाडामुळे अनेक लाभार्थी स्वस्त धान्यापासून वंचित आहेत. दुकान दारांकडूनच हे धान्य मिळत नसल्याचा आरोप करत अनेक ठिकाणी दुकानदार आणि ग्राहक यांच्यात वाद देखील निर्माण होत आहेत. अनेक ठिकाणी ई- पॉझ मशीन प्रशासनाकडे जमा करण्यात आले आहेत. याबाबत राज्य संघटनेशी चर्चा झालेली असून सकारात्मक चर्चा न झाल्यास बीड जिल्हातील मशीन देखील प्रशासनाकडे जमा केल्या जाणार आहेत. ई-पॉझ मशीनमधील बिघाडाची समस्या मागील दोन महिन्यापासून आहे. यामुळे लाभार्थ्यांना जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्यातील स्वस्त धान्य आजही ग्राहकांना मिळालेले नाही.

## हजारो भाविकांच्या उपस्थितीत कावड यात्रेला सुरुवात

### ठिकठिकाणी शितपेय, नाश्ता, भोजनाची व्यवस्था

**प्रतिनिधी**
■ **हिंगोली**

हर हर महादेव, बम बम भोले च्या गजरात हजारो भाविकांच्या उपस्थितीत कळमनुरी येथील चिंचाळेश्वर महादेव मंदिरापासून सोमवारी ता. १२ कावड यात्रेला सुरवात झाली आहे. या कावड यात्रेत सहभागी भाविकांसाठी ठिकठिकाणी भोजन, नाश्ता, शितपेयाची व्यवस्था करण्यात आली आहे.

हिंगोली येथील ओम कयाधू अमृतधारा महादेव मंदिराच्या वतीने आमदार संतोष बांगर यांच्या नेतृत्वाखाली श्रावण महिन्यातील दुसऱ्या सोमवारी कावड यात्रा काढली जाते. यावर्षी या यात्रेचे १५ वे वर्ष आहे. मराठवाड्यातील सर्वात मोठी कावड यात्रा म्हणून या कावड यात्रेची ओळख आहे.

दरम्यान, आज सकाळी हिंगोली



येथील ओम कयाधू अमृतधारा महादेव मंदिरात आमदार संतोष बांगर यांच्या हस्ते महादेवाची पुजा करण्यात आली. यावेळी शिवसेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख आनंदराव जाधव, सुभाष बांगर, राम कदम, श्रीराम बांगर, अॅड. अविनाश बांगर, पिंटू पतंगे, धनंजय पाटील, अभय सावंत पाटील यांच्यासह भाविकांची उपस्थिती होती. त्यानंतर भाविक वाहनाने कळमनुरी येथे रवाना झाले. दुपारी कळमनुरी येथील चिंचाळेश्वर महादेव मंदिरात पुजा व आरती करून दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास कावड यात्रा हिंगोलीकडे निघाली आहे.

हर हर महादेव, बम बम भोलेचा गजर करीत हजारो भाविक या कावड यात्रेत सहभागी झाले आहेत. हिंगोली जिल्हयातील प्रत्येक गावातून भाविक या यात्रेत सहभागी झाले असून हाती डमरू, त्रिशुल घेत अनेकांनी कावड यात्रेत सहभाग नोंदविला आहे. सुमारे १८ किलो मिटर अंतराच्या कावड यात्रेत मुख्य मार्गावर ठिकठिकाणी भाविकांसाठी भोजन, चहापाणी, नाश्ता, शितपेयाची व्यवस्थाही करण्यात आली आहे. खानापूर येथी ज्ञानेश्वर जाधव, वैजनाथ जाधव, जगन जाधव यांच्या वतीने १५०० लिटर दुधाचे वाटप केले जाणार आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी भाविकांची मोठी गर्दी पहावयास मिळत आहे.

## नाश्त्याच्या पोह्यांमध्ये आढळले मुंग्या आणि किडे

■ **भंडारा**

कुठे बाहेर गेलात तर नाश्ता बाहेरच केला पाहिजे. पण त्याच नाश्त्यात मुंग्या आणि किडे दिसले धक्काच बसेल, परंतु असा प्रकार भंडारा जिल्ह्यातील तुमसर तालुक्यातील सिहोरा येथील हॉटेल राजाभाई पोहेवाला येथे समोर आला आहे. या धक्कादायक प्रकारचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. भंडाराजिल्ह्यातील तुमसर येथील काही तरुण रविवारी सुट्टीसाठी चंदपूर देवस्थानला गेले होते. दर्शन घेऊन परत येत असताना ते नास्ता करण्यासाठी थांबले. याठिकाणी त्यांनी पोहे व डोसे मागवले. मात्र त्यांनी घेतलेल्या पोह्यांच्या प्लेटमध्ये लहान मुंग्या आणि किडे दिसून आले. याची माहिती त्यांनी हॉटेल मालकांना दिली. मात्र हॉटेल मालकांनी त्यांच्यासी हुज्जत घालत तुमच्या घरी किडे निघाले, तर फेकता का? असे उलट उत्तर दिले. सदरच्या प्रकारामुळे राजाभाई पोहेवाला हॉटेलमध्ये नागरिकांच्या जीवासी खेळ सुरू असल्याचे समोर येत आहे.

## शरद पवारांनंतर खासदार अमोल कोल्हेंचा ताफा मराठा आंदोलकांनी अडवला

**प्रतिनिधी**
■ **सोलापूर**

मराठा आरक्षण आंदोलकांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार अमोल कोल्हे यांचा ताफा अडवला आहे. खासदार कोल्हे पक्षाच्या शिवस्वराज्य यात्रेवर निघाले आहेत. याआधी राष्ट्रवादी काँग्रेसच प्रमुख शरद पवार यांचा ताफाही सोलापूरमध्ये अडवण्यात आला होता. मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांची शांतता यात्रा आज अहमदनगरमध्ये आहे. त्यांनी कोणत्याही नेत्यांना अडवू नका असे आवाहन केले आहे. मात्र आरक्षणाच्या मुद्यावर आंदोलक आक्रमक झालेले पाहायला मिळत आहेत.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे



यासाठी मराठा समाज आक्रमक झाला आहे. राज्यात ठिकठिकाणी मराठा आंदोलकांकडून आंदोलन सुरु झाले आहे. राजकीय नेत्यांना मराठा समाजाच्या आरक्षणावर भूमिका स्पष्ट करण्याचा आग्रह केला जात आहे.

शरद पवार रविवारी बार्शीकडे निघाले असताना टेंभुर्णी कुर्डूवाडी मार्गावर मराठा आंदोलकांनी त्यांचा ताफा अडवला. मराठा आरक्षणाविषयी भूमिका स्पष्ट करण्याची मागणी करण्यात आली. आंदोलकांनी एक मराठा, लाख मराठा घोषणा दिल्या. शरद पवारांनी गाडीच्या काचा खाली करुन आंदोलकांशी बातचीत केली. मराठा आरक्षणाबद्दल त्यांची भूमिका काय आहे, याची विचारणा करण्यात आली. त्यावर पवारांनी मराठा आरक्षण आंदोलनाला पाठिंबा असल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर आंदोलकांनी पवारांच्या गाडीला वाट मोकळी करुन दिली.

# GRP खाकीतील सखीने रेल्वे महिला प्रवाशांना केले जागरुक

**मुंबई :** जीआरपीचे पोलीस आयुक्त डॉ.रवींद्र शिसवे यांच्या नेतृत्वाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संभाजी यादव यांच्या देखरेखीखाली कुर्ला जीआरपीच्या महिला पोलीस अधिकारी रेल्वेने प्रवास करणाऱ्या महिलांना प्रवास करताना कोणतीही अडचण आल्यास त्यांना 24 तास मदत करण्यास तत्पर असतात , ती व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून मेसेजही पाठवू शकते. मग खाकीतील मित्र ताबडतोब जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधतो आणि त्याला मदत करतात. जर काही कारणाने व्हॉट्सअॅप मेसेज किंवा कॉल आला नाही तर तुम्ही जीआरपी पोलिस हेल्पलाइन 1512 वर कॉल करू शकता. तुम्ही प्रवास करताना 1512 वर कॉल करून मदत मागू शकता आणि खाकी मी सखी नेहमीच तुमचा मित्र असेल, हा खाकीचा उद्देश आहे मी सखी कुर्ला स्थानकावर महिला प्रवाशांना प्रबोधन केले. महिला प्रवाशांना जागरुक करताना जीआरपी पोलीस महिला उपनिरीक्षक वैशाली जरे, एएसआय पूजा प्रकाश गवळी, राजश्री मोरे, मुग्धा अहिरे, प्रियंका देसाई पूजा हिलाल, दीपा पाटील यांनी महिला प्रवाशांना प्रबोधन केले



वेस्टर्न इंडिया बिलियर्ड्स आणि स्नूकर

# खार जिमखान्याच्या साहील काकडने गाजवला दिवस



प्रतिनिधी
■ मुंबई

खार जिमखान्याच्या साहील काकडने खार जिमखाना बिलियर्ड्स हॉलमध्ये खेळल्या जात असलेल्या सीआर रियल्टी-वेस्टर्न इंडिया बिलियर्ड्स आणि स्नूकर स्पर्धेत पुरुषांच्या सीनियर बिलियर्ड्स आणि स्नूकरच्या पहिल्या फेरीतील दोन्ही सामने जिंकले. २६ वर्षीय काकडने स्नूकर स्पर्धेत संघर्षपूर्ण लढतीत पहिली फ्रेम गमावल्यानंतरही मुंबईच्या शाकीर कुरेशीवर ४-३ (२४-६६, ५७-४, ५९-३५, ४९-६६, ५५-२४, 63-65, 53-39) अशी मात केली. तत्पूर्वी, सीनियर स्पर्धेत पहिल्या फेरीच्या सामन्यात त्याने मुंबईच्या सेल्व्हन सॅम्युअलचा ३३७-२३८ असा पराभव केला.

खार जिमखान्याचा आणखी एक खेळाडू सुमेर मागोनेही दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. त्याने सहा फ्रेममध्ये पुण्याच्या सूरज राठीवर 4-2 (5-71, 37-68, 81-1, 65-55, 52-26, 69-5) असा विजय मिळवला.

माजी राष्ट्रीय विजेता आदित्य मेहताने (पीएसपीबी) मुंबईच्या अनंत मेहताचा 4-0 (62-34, 71 (52)-13, 74-21, 84-27) असा धुव्वा उडविला. तामिळनाडूच्या जे. वरुण कुमारने मुंबईच्या जनक मसंदला ४-० (६७-५८, ५३-२७, ७४ (६०)-१५, ४८-८) अशा फरकाने हरवले. पीएसपीबीच्या एस. श्रीकृष्णने मध्य प्रदेशच्या पीयूष कुशवाहवर 4-3 (21-67, 40-89(81), 46-79, 69-29, 56-15, 57-21, 55-31) असा विजय मिळवला.

पॅरिस ऑलिम्पिक 2024

# विनेश फोगट प्रकरणात स्वत: खेळाडू व प्रशिक्षक जबाबदार...

## IOAच्या अध्यक्ष पीटी उषा यांनी झटकली जबाबदारी | जागतिक क्रीडा लवाद आज देणार निर्णय

वृत्तसंस्था
■ पॅरिस

भारतीय महिला कुस्तीपटू विनेश फोगट हिला अतिरिक्त वजनामुळे पॅरिस ऑलिम्पिकसाठी अपात्र घोषित ठरण्यात आले होते. याप्रकरणावर विनेशने आंतरराष्ट्रीय क्रीडा लवादामध्ये याचिका सादर केली होती. सध्या CAS मध्ये यावर सुनावणी सुरू असून त्यावर उद्या १३ ऑगस्ट रोजी निकाल दिला जाणार आहे. या संपूर्ण वादावर भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्षा पीटी उषा यांनी आता वजन नियंत्रित करणे ही खेळाडूची जबाबदारी असल्याचे म्हटले आहे. यासाठी वैद्यकीय पथकावर टीका करणे योग्य नाही.उषा यांच्या या स्पष्टीकरणावरून देशातील क्रीडा शौकिनांत संतापाची लाट उसळली आहे.

५० किलो वजनी गट फ्रीस्टाइल कुस्तीच्या अंतिम फेरीत प्रवेश केल्याने विनेशला रौप्य पदकाची खात्री होतीच, परंतु पदक सामन्यापूर्वी १०० ग्रॅम जास्त वजनामुळे तिला अपात्र ठरवण्यात आले. यानंतर





विनेशने सोशल मीडियावर एक भावनिक पोस्ट शेअर करत निवृत्तीची घोषणा केली होती. विनेश फोगटच्या अपात्रतेनंतर आयओएच्या वैद्यकीय पथकाला, विशेषत: डॉ. दिनशॉ पारडीवाला आणि त्यांच्या टीमवर निष्काळजीपणाचा आरोप करत आहे.

पीटी उषा म्हणाल्या, 'कुस्ती, वेटलिफ्टिंग, बॉक्सिंग, ज्युडो यांसारख्या खेळांमध्ये खेळाडूंच्या वजन व्यवस्थापनाची जबाबदारी प्रत्येक खेळाडू आणि त्याच्या प्रशिक्षकावर असते. आयओएचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. दिनशॉ पारडीवाला आणि त्यांच्या टीमवर नाही.' त्या पुढे म्हणाल्या, 'आयओए वैद्यकीय संघ, विशेषत: डॉ. पारडीवाला यांच्यावरील टीका अस्वीकार्य आणि निषेध करण्याजोगी आहे.' पीटी उषा म्हणाल्या की, त्यांना आशा आहे की लोक 'कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचण्यापूर्वी सर्व बाजूंनी विचार करतील'.

विनेशने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये तिच्या गटात अंतिम सामना गाठणारी पहिली भारतीय महिला कुस्तीपटू बनून इतिहास घडवला. परंतु अंतिम फेरीपूर्वी तिचे वजन वाढले होते, अथक प्रयत्नांनंतरही विनेशचे वजन १०० ग्रॅम जास्त असल्याचे आढळून आले. परिणामी विनेशला ऑलिम्पिकमधून अपात्र घोषित केले. यानंतर तिने आंतरराष्ट्रीय क्रीडा लवादाकडे (CAS) संयुक्त रौप्य पदक मिळावं, अशी मागणी केली आहे.

### वैद्यकीय पथक फक्त खेळाडूची दुखापत, वैद्यकिय बाबींवर लक्ष ठेवण्यासाठी

*पीटी उषा म्हणाल्या, 'पॅरिस ऑलिम्पिकमध्ये प्रत्येक भारतीय खेळाडूला अशा खेळांमध्ये स्वत:ची सपोर्ट टीम असते. जे अनेक वर्षांपासून खेळाडूंसोबत काम करत आहेत. आयओएने काही महिन्यांपूर्वी वैद्यकीय पथकाची नियुक्ती केली होती, जी स्पर्धेदरम्यान आणि नंतर खेळाडूंच्या रिकव्हरी आणि दुखापतींच्या व्यवस्थापनासाठी मदत करेल. ज्या खेळाडूंकडे न्यूट्रिशनिस्ट आणि फिजिओथेरपिस्टची स्वत:ची टीम नाही, अशा खेळाडूंना मदत करण्यासाठीही ही टीम तयार करण्यात आली होती.*

# रौप्यपदकाच्या प्रतिक्षेत असलेल्या विनेश फोगटला भारतात येताच खाप पंचायत देणार 'सुवर्णपदक'



वृत्तसंस्था
■ चंदिगड

भारताची स्टार कुस्तीपटू विनेश फोगटने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सलग तीन सामने जिंकून अंतिम फेरीत प्रवेश केला. पण अंतिम फेरीत तिचे वजन निर्धारित मर्यादेपेक्षा (५० किलो) १०० ग्रॅम जास्त होते, त्यामुळे तिला अपात्र ठरवण्यात आले ज्यामुळे पॅरिस ऑलिम्पिकमधून ती बाहेर पडली. यानंतर तिने कुस्तीतून निवृत्ती घेण्याचा निर्णयही घेतला आहे. दरम्यान, हरियाणाच्या जनतेने मोठा निर्णय घेतला आहे.

अतिरिक्त वजनामुळे विनेशला ऑलिम्पिकमधून अपात्र ठरवण्यात आले यानंतर तिने न डगमगता संयुक्त रौप्य पदक मिळावे यासाठी आंतरराष्ट्रीय क्रीडा लवादाकडे अपील केले आहे. या प्रकरणाची सुनावणीही सुरू आहे. पण या दरम्यानच विनेश फोगटबाबत सर्व खापच्या वतीने महापंचायत घेण्यात आली. या महापंचायतीत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. विनेश भारतात परतल्यावर खाप पंचायत तिचे स्वागत मोठ्या थाटात स्वागत करेल. यादरम्यान विनेश फोगटला सर्व खापच्या वतीने सुवर्णपदक देण्यात येणार आहे.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये विनेश फोगटने शानदार सुरुवात केली होती. उपउपांत्यपूर्व फेरीत तिचा सामना जपानची स्टार खेळाडू आणि वर्ल्ड चॅम्पियन सुसाकीशी झाला. विनेश फोगटने या चार वेळच्या विश्वविजेत्या कुस्तीपटूला पराभूत करून मोठा अपसेट निर्माण केला. सुसाकीनंतर विनेशने माजी युरोपियन चॅम्पियन युक्रेनच्या ओक्साना लिवाचचा पराभव केला. उपांत्य फेरीत तिने पॅन अमेरिकन गेम्स चॅम्पियन क्युबाच्या युस्नेलिस गुझमनचा पराभव केला. अंतिम फेरीत तिचा सामना अमेरिकेच्या सहाव्या मानांकित सारा हिल्डब्रँडशी होणार होता. पण सामन्यापूर्वीच तिला अपात्र ठरवण्यात आले.

विनेश फोगटने अंतिम फेरीत अपात्रतेच्या निर्णयाला विरोध दर्शवला आहे. तिने सीएएसकडे अपील केले आहे आणि या प्रकरणी १३ ऑगस्टपर्यंत निर्णय येऊ शकतो. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताला एकही सुवर्णपदक जिंकता आलेले नाही. यावेळी भारताच्या खात्यात ५ कांस्य आणि १ रौप्य पदक आहे. विनेशला रौप्यपदक मिळाल्यास या ऑलिम्पिकमध्ये भारताची ७ पदके असतील.

*सर्व खाप पंचायतीने ट्विट करून याबाबत माहिती दिली. ते म्हणाले, 'सर्वखाप पंचायतीने एक मोठा निर्णय घेतला आहे. विनेश भारतात परतल्यावर एक भव्य समारंभ आयोजित केला जाईल आणि सर्वखाप पंचायत विनेशला सुवर्णपदक देईल. 'माझी मुलगी ही माझा अभिमान आहे.'*
**– सर्वखाप पंचायत.**

# महाराष्ट्र कॅरम संघटनेच्या 70 व्या वर्धापनदिनानिमित्त रंगली रॅपिड कॅरम स्पर्धा

## स्पर्धेत नामवंत राष्ट्रीय ,आंतरराष्ट्रीय कॅरमपटुंचा मोठा सहभाग

प्रतिनिधी
■ मुंबई

राज्यात आणि देशात कॅरमचा प्रसार आणि प्रचार करण्यात सिंहाचा वाटा उचलणाऱ्या महाराष्ट्र सारं संघटना यंदा आपला ७० वा वर्धापनदिन साजरा करीत आहे . त्यानिमित्ताने संघटनेचे सर्वेसर्वा आणि आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक अरुण केदार यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबईच्या सूर्यवंशी सभागृहात आगळ्या वेगळ्या रॅपिडॉ कॅरम स्पर्धे शानदार उदघाटन सोमवारी सकाळी मुंबई क्रिकेट संघटनेचे युवा अध्यक्ष अजिंक्य नाईक यांच्या हस्ते पार पडले.या स्पर्धेत मुंबईसह राज्यातील नामवंत राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कॅरमपटू सहभागी झाले आहेत. याप्रसंगी महाराष्ट्र कॅरम संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र शाह ,सूर्यवंशी ज्ञाती समाजाचे अध्यक्ष जयंत पाटील ,हे मान्यवर उपस्थित होते मुंबई क्रिकेट संघटनेच्या अपेक्स . कौन्सिलचे सदस्य अभय हडप,जेष्ठ राष्ट्रीय कॅरमपटू अरुण देशपांडे हे मान्यवर उपस्थित होते.





फोटो : अनिल पानस्कर

१२ ते १४ ऑगस्ट २०२४ अशा तीन दिवस रंगणाऱ्या या स्पर्धेत महाराष्ट्रातील २३६ पुरुष व ४४ महिला कॅरमपटूंनी भाग घेतला आहे. सोमवारी सकाळी पुरुष एकेरी गटाच्या सामन्यांना सुरुवात झाली तर महिला एकेरी गटाचे सामने मंगळवारपासून खेळविण्यात येतील.

# गणेशोत्सवापूर्वी मुंबई गोवा हायवेवरील गणेशभक्तांचा कोकण प्रवास खड्डे मुक्त करणार

## मंत्री नितीन गडकरी यांचे खासदार रविंद्र वायकर यांना आश्वासन

प्रतिनिधी
■ मुंबई

गणेशोत्सवापूर्वी कोकणात जाण्यासाठी रस्ते प्रवास करणाऱ्या गणेश भक्तांच्या मार्गात कुठलेही विघ्न येऊ नये याची खबरदारी घेण्याबरोबरच गणेशोत्सवापूर्वीच मुंबई गोवा मार्गावरील खड्डे बुजवण्यात येतील, तसेच डिसेंबर पर्यत या राज्य मार्गाच्या चौपदरी करणाचे काम पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन केंद्रीय रस्ते परिवहन व राज्य मार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी मुंबई उत्तर पश्चिमचे खासदार रविंद्र वायकर यांना दिले. यावेळी खा.वायकर यांनी मंत्री गडकरी यांना या मागण्यांचे निवेदन दिले.

मुंबई गोवा राज्य मार्गाच्या चौपदरीकरणाचे काम गेल्या १० वर्षापासून सुरु आहे. ४७१ कि.मी रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम २०११ पासून सुरु करण्यात आले.



अद्याप हे काम पूर्ण झाले नसून या कामाला विलंब होत आहे. या राज्य मार्गाचे काम टप्प्या टप्प्याने करण्यात येत आहे. अद्याप या महामार्गाचे काम पूर्ण करण्यात आले नाही, त्यातील अनेक ठीकाणावरील रस्त्यावर खड्डे पडले आहेत. त्यामुळे या राज्य मार्गावरून प्रवास करताना प्रवाश्यांना अनेक अडचणीचा सामना करावा लागतो. त्यामुळे गणेशोत्सवा पूर्वी मुंबई गोवा महामार्गावरील प्रवास खड्डे मुक्त करावा, असे न खासदार रविंद्र वायकर यांनी मंत्री गडकरी यांना दिलेल्या.निवेदनात म्हटले आहे.

गणेशोत्सवापूर्वी मुंबई गोवा राज्य मार्गावरली खड्डे बुजवण्यात येतील, असे आश्वासन मंत्री नितिन गडकरी यांनी दिले. त्याच बरोबर या मार्गावर बांधण्यात येणारे ट्रॉमा हॉस्पिटलचे काम लवकर सुरु करून ते पूर्ण करावे, अशी विनंती वायकर यांनी मंत्री नितिन गडकरी यांना यावेळी केली.

मुंबई गोवा राज्य मार्गावरील भोस्ते घात येथे मोठ्या प्रमाणात अपघात होतात. भोस्ते व परशुराम घाट येथे भूउत्खलन होता आहे. त्यामुळे या दोनही ठिकाणी टनेल बांधण्याचे काम करण्यात यावे, अथवा रेल्वे मार्गाला लागून समांतर रस्ता तयार करण्यात यावा., असे वायकर यांनी गड्कारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

# वर्सोवा विधानसभेत कॉंग्रेसची शानदार न्याय यात्रा निघाली



■ मुंबई

मुंबई कॉंग्रेस अध्यक्षा खासदार वर्षा गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली वर्सोवा विधानसभेत न्याय यात्रा काढण्यात आली. डॉ. आंबेडकर चौकातून सुरू झालेली ही न्याय यात्रा बेहराम बाग नाका येथे संपली. न्याय यात्रेत अल्पसंख्याक समाजातील हजारो लोक ज्या प्रकारे सहभागी झाले होते ते पाहून वर्षा गायकवाड यांना आनंद झाला. न्याय यात्रेदरम्यान अखिल भारतीय अल्पसंख्याक विभागाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष आणि युवक कॉंग्रेसचे नेते फरहान आझमी यांनी मोहब्बत की दुकान या नावाने लावलेल्या गाड्या विशेष आकर्षणाचे केंद्र ठरल्या होत्या. या वाहनांमधून रॅलीत सहभागी झालेल्या नागरिकांना थंड पेय देण्यात आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातून निघालेल्या न्याय यात्रेत अल्पसंख्याक विभागातील हजारो नागरिक सामील झाले आणि बेहराम बाग नाका येथे पोहोचले. आझमी यांनी वर्षा गायकवाड यांचे स्वागत केले. त्यांच्या स्वागताने आनंदित झालेल्या वर्षा गायकवाड यांनी कृतज्ञता व्यक्त करत आपण सर्वांनी मिळून कॉंग्रेसची ताकद परत आणायची आहे, असे सांगितले. न्याय यात्रेदरम्यान जिल्हाध्यक्ष क्लाईव्ह डायस निरीक्षक डॉ.किशोर सिंग यांच्यासह वर्षा गायकवाड, अल्पसंख्याक विभागाचे मुंबई अध्यक्ष हाजी इब्राहिम भाई जान सिकंदर आझम गफूर खान जय गुप्ता आणि सर्व मूलभूत कॉंग्रेस, युवक कॉंग्रेस, एनएसयूआय, महिला कॉंग्रेस आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# कसबे तडवळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारुन दिवंगत अशोक भालेरावांचे स्वप्न साकारणार!

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे आश्वासन

प्रतिनिधी
■ मुंबई

महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक धाराशिव मधील कसबे तडवळे या गावात उभारण्याबाबत महाराष्ट्र शासनाने मंजुरी दिली आहे मात्र येथे अद्याप स्मारक उभारण्यात आलेले नाही. कसबे तडवळे या गावात महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारले जावे ही दिवंगत अशोक भालेराव यांची इच्छा होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या कसबे तडवळे मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारून या स्मारकाबाबत दिवंगत अशोक भालेराव यांनी पाहिलेले स्वप्न आपण पूर्ण करू .त्यासाठी लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आपण भेटणार असल्याचे



रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी म्हटले.

रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि निवृत्त पोलीस अधिकारी दिवंगत अशोक भालेराव यांची रिपब्लिकन पक्षाच्या वतीने जाहीर श्रद्धांजली सभा नुकतीच माता रमाबाई आंबेडकर नगर येथील शहीद स्मारक घाटकोपर पूर्व येथे आयोजित करण्यात आली होती त्यावेळी नामदार रामदास आठवले बोलत होते.

यावेळी ना .रामदास आठवले यांनी दिवंगत ज्येष्ठ नेते अशोक भालेराव यांच्या अनेक स्मृती जागवून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी रिपब्लिकन पक्षाचे अनेक ज्येष्ठ नेते उपस्थित होते.

# मुंबई पोर्ट प्राधिकरणाचे नवनिर्वाचित बोर्ड मेंबर प्रदीप नलावडे यांचा सत्कार




प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनचे उपाध्यक्ष व मुंबई पोर्ट प्राधिकरणाचे नवनिर्वाचित बोर्ड मेंबर प्रदीप नलावडे यांची १२ ऑगस्ट २०२४ रोजी पहिली बोर्ड मिटिंगच्या दिवशी त्यांचा युनियनच्या वतीने मुंबई पोर्ट प्राधिकरणाचे चेअरमन राजीव जलोटा व डेप्युटी चेअरमन आदेश तितरमारे यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ देऊन बोर्ड रूम मध्ये सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक जनरल एम्पलॉईज युनियनचे जनरल सेक्रेटरी सुधाकर अपराज, सेक्रेटरी व माजी बोर्ड मेंबर दत्ता खेसे, ट्रान्सपोर्ट अँड डॉक वर्कर्स युनियनचे जनरल सेक्रेटरी केरसी पारेख, युनियनच्या खजिनदार व बोर्ड मेंबर कल्पना देसाई, युनियनचे पदाधिकारी मनीष पाटील, विकास नलावडे, शीला भगत, रमेश कुऱ्हाडे, मारुती विश्वासराव, संदीप चेरफळे, प्रवीण काळे, आप्पा भोसले, बबन मेटे, बापू घाडीगावकर, वाडेकर, बोर्ड मेंबर्स, इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. मुंबई पोर्ट प्राधिकरणाच्या वतीने चेअरमन राजीव जलोटा यांनी नवीन बोर्ड मेंबर प्रदीप नलावडे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

# बांग्लादेशातील घटना मानवतेला लाजविणारी

## जगद्गुरू स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती यांची कडक प्रतिक्रिया

प्रतिनिधी
■ मुंबई

बांग्लादेशात हिंदूंवर होणाऱ्या अत्याचारांवर अनंत श्री विभूषित द्वारका शारदा आणि ज्योतिष द्विपीठाधीश्वर जगद्गुरू स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती यांनी कठोर प्रतिक्रिया दिली आहे. मुंबईत माध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितले की, बांग्लादेशातील घटना मानवतेला लाजविणारी आहे. तिथल्या उपासना स्थळांवर हल्ले होत आहेत, माता-भगिनींवर अत्याचार होत आहेत.

भारत सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मी विनंती करतो की, बांग्लादेशातील हिंदूंच्या सुरक्षेसाठी अधिक पावले उचलावीत. धार्मिक स्थळांची सुरक्षा करावी आणि जे हिंदू भारतात यायचे इच्छुक आहेत त्यांना येथे आणावे.स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती यांनी असेही सांगितले की, भारतात अवैधपणे राहणाऱ्या घुसखोरांना देशातून बाहेर काढावे. तसेच, धर्माच्या अधीन राहूनच राजकारण करावे, म्हणजे राष्ट्र



आणि जगात शांती नांदेल. भारताची विशेषता हीच आहे की इथे धर्माचे स्पंदन कायम आहे.

या कार्यक्रमात उपस्थित असलेल्या भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनीही स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती यांचा आशीर्वाद घेतला. स्वामीजींनी पंकजा मुंडे यांच्या वडिलांसोबत असलेल्या भावनिक नात्याचा उल्लेख केला आणि समाजसेवा आणि राष्ट्रसेवा करण्याचे आवाहन केले.स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती यांनी श्री यंत्र पूजेचे महत्त्वही स्पष्ट केले आणि सनातन धर्माच्या महानतेविषयी चर्चा केली. त्यांनी सांगितले की, भारत नेहमीच उदार राहिला आहे, कधीही कोणावर हल्ला केला नाही, उलट सगळ्यांना शांतीचा संदेश दिला आहे.

# ऑटोमेशन एक्स्पो 2024 मध्ये एआय आणि रोबोटिक्सचे प्रदर्शन

**मुंबई :** ऑटोमेशन इंडस्ट्रीसाठीचे भारतातील सर्वात मोठे प्रदर्शन असलेल्या ऑटोमेशन एक्स्पोने आपल्या १७व्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व परिषदेची घोषणा केली आहे. हा महत्त्वपूर्ण उपक्रम २१-२४ ऑगस्ट दरम्यान बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, नेस्को, मुंबई येथे भरणार आहे. एक महत्त्वाचा टप्पा मानला जाणारा हा एक्स्पो भारताच्या ऑटोमेशन उद्योगक्षेत्रामध्ये वेगाने होत असलेल्या वाढीचे आणि नवसंकल्पनांचे प्रदर्शन मांडणार आहे. ऑटोमेशन एक्स्पो २०२४ मध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आणि रोबोटिक्सच्या उत्पादन प्रक्रिया व कारखान्यांतील स्वयंचलित तंत्रज्ञानावर पडणाऱ्या परिवर्तनकारी प्रभावावर प्रकाशझोत टाकला जाणार आहे. एआय आणि रोबोटिक्सने उद्योगाक्षेत्रात क्रांती घडवून आणली आहे. हा एक्स्पो ३०, हजार चौ. मीटर्सच्या क्षेत्रावर भरविला जाणार असून त्यात ५०० हून अधिक प्रदर्शक व एबीबी, अँडएज, अँडव्हान्टेक, अल्ट्रस्ट, ऑटोबॉट्स, ऑटोमोटिव्ह रोबोटिक्स, एप्सन, पॅनासॉनिक, प्रामा हिकव्हिजन अशा १ हजार हून अधिक ब्रॅण्ड्सचा समावेश असणार आहे.

# सायरस पूनावाला, शिव नाडर, सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय, डॉ. राणी बंग यांचा सन्मान



प्रतिनिधी
■ मुंबई

एक प्रसिद्ध नैसर्गिक हिरे कंपनी श्री.रामकृष्ण एक्सपोर्ट्स (SRK) ची परोपकारी शाखा असलेल्या श्री.रामकृष्ण नॉलेज फाउंडेशन (SRKKF) च्या वतीने जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आयोजित करण्यात आलेला संतोकबा मानवतावादी पुरस्कार समारंभ मोठ्या थाटात पार पडला.सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक सायरस पूनावाला, शिक्षण सुधारक व एचसीएल आणि शिव नाडर फाउंडेशनचे संस्थापक शिव नाडर, तसेच सामाजिक कार्यकर्ते आणि सर्च फाउंडेशन संस्थापक, डॉ. अभय बंग व डॉ. राणी बंग यांचा यावेळी कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. 'सिटी ऑफ ड्रीम्स', मुंबई येथे प्रथमच संतोकबा मानवतावादी पुरस्कारांचे आयोजन करण्यात आले होते.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी अयोध्येतील श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे विश्वस्त व महर्षी वेदव्यास प्रतिष्ठान अध्यक्ष स्वामी गोविंद देव गिरीजी महाराज हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासमवेत मा. उत्तर प्रदेशच्या राज्यपाल श्रीमती आनंदीबेन पटेल आणि महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते.

## अमेरिकेने मध्यपूर्वेत क्षेपणास्त्रांनी सुसज्ज पाणबुडी पाठवली

**लंडन :** अमेरिकेने मार्गदर्शित क्षेपणास्त्रांनी सुसज्ज असलेल्या पाणबुड्या आणि F-35C लढाऊ विमानांनी सुसज्ज विमानवाहू जहाजे मध्य पूर्वेकडे पाठवली आहेत. इस्रायल आणि इराणमधील युद्धाची वाढती भीती लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. इस्रायलचे संरक्षण मंत्री योव गॅलंट आणि अमेरिकेचे संरक्षण मंत्री लॉयड ऑस्टिन यांच्यात झालेल्या चर्चेनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. इस्रायलच्या संरक्षणासाठी अमेरिका कटिबद्ध असल्याचे अमेरिकेच्या संरक्षणमंत्र्यांनी सांगितले. यापूर्वी 1 ऑगस्ट रोजी वॉशिंग्टन पोस्टने आपल्या वृत्तात म्हटले होते की, अमेरिकेने मध्यपूर्वेत 12 नवीन युद्धनौका तैनात केल्या आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्याशी फोनवरील संभाषणात इस्रायलचा बचाव करण्याचे आश्वासन दिले.



# बांगलादेशात भारतीय सैन्याचे विजय स्मारक पाडले

## आंदोलकांनी ते उध्वस्त केले; यात 1971 च्या युद्धातील पाकचा पराभव दर्शविला होता

**वृत्तसंस्था**
**ढाका**

बांगलादेशातील आंदोलकांनी 1971 च्या युद्धाशी संबंधित राष्ट्रीय स्मारक पाडले. मुजीबनगरमध्ये असलेले हे स्मारक भारत-मुक्तीवाहिनी लष्कराच्या विजयाचे आणि पाकिस्तानी लष्कराच्या पराभवाचे प्रतीक होते.

16 डिसेंबर 1971 रोजी पाकिस्तानचे लेफ्टनंट जनरल एएके नियाझी यांनी हजारो सैनिकांसह भारतीय सैन्यासमोर आत्मसमर्पण केले. त्यांनी भारतीय लष्कराचे ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ लेफ्टनंट-जनरल जगजित सिंग अरोरा यांच्यासमोर कागदपत्रांवर स्वाक्षरी केली. त्यांची प्रतिमा या स्मारकात कोरलेली आहे.

त्याचवेळी बांगलादेशच्या अंतरिम सरकारने शेख हसीना यांना परत येण्यास सांगितले आहे. हसीना यांच्या राजीनाम्यानंतर स्थापन झालेल्या सरकारमध्ये गृहमंत्रालयाची जबाबदारी सांभाळणारे ब्रिगेडियर जनरल एम सखावत यांनी हसीना यांच्या पक्षाला नव्या चेहऱ्यांची गरज असल्याचे म्हटले आहे.

हसीना यांना देशातून हाकलण्यात आले नव्हते, तर त्या स्वतः पळून गेल्या होत्या, असेही ते म्हणाले. देशातील परिस्थिती पुन्हा



बिघडू नये, म्हणून त्या परत येऊ शकतात, असे सखावत यांनी म्हटले आहे. यावेळी भारत बांगलादेशच्या लोकांच्या पाठीशी उभा आहे, पण अशा अराजकाला कधीही माफ करता येणार नाही, असे शशी थरूर यांनी लिहिले आहे.

यावेळी भारत बांगलादेशच्या लोकांच्या पाठीशी उभा आहे, पण अशा अराजकाला कधीही माफ करता येणार नाही, असे शशी थरूर यांनी लिहिले आहे. या स्मारकात पाकिस्तानी लष्कराचे मेजर जनरल अमीर अब्दुल्ला खान नियाझी यांनी भारतीय लष्कर आणि बांगलादेशच्या मुक्ती वाहिनीला 'शरणागती पत्र'वर स्वाक्षरी करताना दाखवले आहे.

मोहम्मद युनूस हा भारताला धोका नसल्याचे काँग्रेस नेते शशी थरूर यांनी एका मुलाखतीत म्हटले आहे. युनूस यांचा पाकिस्तानच्या आयएसआय किंवा जमात-ए-इस्लामीशी कोणताही संबंध नसल्याचे त्यांनी सांगितले. ते अमेरिकेच्या जवळ आहेत. अशा स्थितीत त्यांनी अंतरिम सरकार स्थापन केल्याने भारत-बांगलादेश संबंधांवर फारसा परिणाम होणार नाही.

त्याचवेळी बांगलादेशात हिंदूंवर होत असलेल्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस हिंदू विद्यार्थ्यांची भेट घेणार आहेत. हिंदू विद्यार्थी अल्पसंख्याक हक्क आंदोलन गट युनूस सरकारपुढे 8 मागण्या मांडणार आहेत. ढाका ट्रिब्यूननुसार, शेख हसीना यांच्या राजीनाम्यानंतर हिंदू समुदायावरील हल्ल्यांशी संबंधित 205 घटनांची नोंद झाली आहे.

# माजी इंग्लिश क्रिकेटपटू ग्रॅहम थॉर्पने केली आत्महत्या

**वृत्तसंस्था**
**लंडन**



**7 दिवसांनंतर पत्नीचा खुलासा- नैराश्याशी झुंजत होता**

इंग्लंडचा माजी क्रिकेटपटू ग्रॅहम थॉर्पने सात दिवसांपूर्वी आत्महत्या केली होती. थॉर्प यांच्या मृत्यूनंतर 7 दिवसांनी सोमवारी त्यांची पत्नी अमांडा थोर्प यांनी आत्महत्या केल्याचा खुलासा केला. यापूर्वीही त्यांनी असे प्रयत्न केले आहेत.

अमांडा यांनी माजी इंग्लिश कर्णधार मायकेल अथर्टनला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, थॉर्प खराब प्रकृतीमुळे नैराश्य आणि चिंतेने त्रस्त होता, त्यामुळे त्यांना आपला जीव गमवावा लागला. थॉर्प यांनी निधन होण्यापूर्वी स्वतःशी दीर्घ मानसिक आणि शारीरिक लढाई केली होती.

थोर्प यांचे वयाच्या 55 व्या वर्षी 5 ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्या मृत्यूची घोषणा इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाने (ECB) केली. तेव्हा मृत्यूचे कारण सांगितले नव्हते.

थोर्प यांच्या पत्नीच्या हवाल्याने सांगितले गेले - 'पत्नी आणि दोन मुली असूनही ते सावरू शकले नाहीत. ते खूप आजारी होते आणि त्यांना वाटले की आपण त्यांच्याशिवाय चांगले जगू आणि त्यांनी आपला जीव गमावला आणि आम्ही उद्ध्वस्त झालो.'

गेल्या शनिवारी फर्नहॅम क्रिकेट क्लब आणि चिपस्टेड क्रिकेट क्लब यांच्यातील सामन्यापूर्वी एका समारंभात थॉर्प यांचे स्मरण करण्यात आले. या समारंभाला त्यांची पत्नी आणि मुली किटी (22) आणि एम्मा (19) उपस्थित होत्या.

तिथे अमांडा म्हणाल्या- ग्रॅहम गेल्या काही वर्षांपासून नैराश्य आणि चिंतेने त्रस्त होते. त्यांनी मे 2022 मध्ये आत्महत्येचा प्रयत्न केला, ज्यामुळे त्यांना अनेक दिवस अतिदक्षता विभागात घालवावे लागले. त्यांना नैराश्य आणि चिंतेने ग्रासले होते, जे कधीकधी अत्यंत गंभीर होते.

थॉर्प यांनी 1993 ते 2005 दरम्यान इंग्लंडकडून 100 कसोटी सामने खेळले. यासोबतच ते इंग्लंडच्या वरिष्ठ पुरुष संघाचा फलंदाजी प्रशिक्षकही होते. 2022 पासून ते गंभीर आजारी होते. त्यांची अफगाणिस्तानच्या मुख्य प्रशिक्षकपदीही नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, त्यांना त्यांचा कार्यकाळ पूर्ण करता आला नाही. आपल्या 13 वर्षांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत, थॉर्प यांनी इंग्लंडसह सरे क्लबसाठी काही महत्त्वाचे सामने जिंकले. या फलंदाजाने सरेकडून काउंटी क्रिकेट खेळले आणि संघासाठी जवळपास 20,000 धावा केल्या.

पान ९ वरुन

### काँग्रेसला शेअर बाजार संपवायचा आहे - भाजप

सेबीने रविवारी सांगितले की त्यांनी सेबी समूहावरील सर्व आरोपांची चौकशी केली आहे. सभापती माधबी बुच यांनी वेळोवेळी सर्व खुलासा केला आहे. हितसंबंधांच्या संभाव्य संघर्षांचा समावेश असलेल्या प्रकरणांपासून त्यांनी स्वतःला दूर केले आहे. सेबीच्या म्हणण्यानुसार, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, अदानी समूहाविरुद्ध 24 पैकी 22 तपास 3 जानेवारी 2024 पर्यंत पूर्ण झाले आहेत. दुसरा तपास 24 मार्चपर्यंत पूर्ण झाला. सेबीच्या प्रमुख माधबी बुच आणि त्यांचे पती धवल बुच यांनीही हिंडेनबर्गच्या आरोपांना त्यांची प्रतिमा डागाळण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले आहे. अहवालावर सेबी प्रमुखांच्या वक्तव्यावर हिंडेनबर्ग म्हणाले - आमच्या अहवालावर माधबी बुच यांनी दिलेल्या प्रतिक्रियेमुळे अनेक नवीन महत्त्वाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. बुच यांच्या विधानावरून विनोद अदानी यांनी कथितरित्या पळवून नेलेल्या पैशाची तसेच त्यांनी अस्पष्ट फंड स्ट्रक्चरमध्ये केलेली गुंतवणूक याची पुष्टी केली आहे. त्यांनी देखील पुष्टी केली की हा निधी त्यांच्या पतीच्या बालपणीच्या मित्राने चालवला होता, जो त्यावेळी अदानी समूहाचा संचालक होता. हिंडेनबर्गच्या अहवालावर अदानी समूहाने म्हटले आहे की, समूहाचे सेबी प्रमुखांशी व्यावसायिक संबंध नाहीत. सेबी प्रमुखांसोबत ज्या लोकांची नावे घेण्यात आली आहेत त्यांच्याशीही या समूहाचा कोणताही संबंध नाही. परदेशी होल्डिंगवर उपस्थित केलेले प्रश्न निराधार आहेत. समूहाच्या विदेशी होल्डिंगची रचना पूर्णपणे पारदर्शक आहे. त्याचा वापर निधीच्या गैरवापरासाठी झाला नाही. समूह म्हणाला- हिंडनबर्गने स्वतःच्या फायद्यासाठी सार्वजनिकरित्या उपलब्ध माहितीचा दुरुपयोग केला. अदानी समूहावरील आरोप यापूर्वीच निराधार सिद्ध झाले आहेत. सखोल तपासानंतर, सर्वोच्च न्यायालयाने जानेवारी 2024 मध्ये हिंडेनबर्गचे आरोप फेटाळून लावले.

### तर शरद पवारांना सुवर्णपदक मिळेल

पुढे बोलताना, “लोकसभ निवडणुकीत शरद पवार यांच्याबद्दल लोकांमध्ये सहानुभूती होती, असं वाटत नाही. फक्त माध्यमांतील काही लोकांनाच त्यांच्याबद्दल राज्यात सहानुभूती असल्याचं वाटतं. तेच लोक सतत सहानुभूतीचा डंका वाजतवत असतात”, अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली. तसेच “राज्यात त्यांच्याबद्दल सहानुभूती असती, तर बीडची जागा त्यांनी फक्त ६ हजार मतांनी जिंकली नसती. ती जागा त्यांनी मतांचं ध्रुवीकरण करून जिंकली”, असेही ते म्हणाले. “लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांनी अतिशय अनुभवाने आपल्या जागा निवडल्या आणि त्याचं श्रेय त्यांना द्यावंच लागेल. कुठे सरकारविरोधात

# शंभू सीमेची एक लेन खुली करा !

## सुप्रीम कोर्टाचा आदेश
## रुग्णवाहिका, वयोवृद्ध महिला व विद्यार्थ्यांना त्रास

**वृत्तसंस्था**
**चंदीगड**

सुप्रीम कोर्टाने पंजाब आणि हरियाणा दरम्यानची शंभू सीमा अर्धवट उघडण्याचे आदेश दिले आहेत, जी सुमारे 6 महिने बंद आहे. हायवे म्हणजे पार्किंगची ठिकाणे नाहीत, अशी कडक टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीदरम्यान केली. सर्वोच्च न्यायालयाने एका आठवड्यात रुग्णवाहिका, ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी आदींसाठी महामार्गाची एक लेन खुली करण्याचे आदेश दिले.

यासाठी पंजाब आणि हरियाणाच्या डीजीपींशिवाय पतियाळा, मोहाली आणि अंबालाच्या एसपींना बैठक घेऊन निर्णय घेण्यास सांगण्यात आले होते. या प्रकरणाची सुनावणी



22 ऑगस्ट रोजी होणार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. मात्र, पंजाब आणि हरियाणाच्या पोलिस अधिकाऱ्यांमध्ये करार झाला असेल तर सुनावणीच्या तारखेची वाट पाहण्याची गरज नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे.

याआधी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने शंभू बॉर्डर उघडण्यास सांगितले होते. याविरोधात हरियाणा सरकार सर्वोच्च न्यायालयात गेले. याशिवाय पंजाब आणि हरियाणा सरकारने आंदोलक शेतकऱ्यांशी बोलण्यासाठी निष्पक्ष समितीच्या सदस्यांची नावे दिली आहेत. या समितीचे सदस्य शेतकरी आणि केंद्र सरकार यांच्यात मध्यस्थ म्हणून काम करतील. सुप्रीम कोर्टाने असेही म्हटले आहे की, जर आम्ही दोघांनाही नावे देण्यास पटवून देण्यात यशस्वी झालो आहोत, आता अशी परिस्थिती असताना तुम्ही शेतकऱ्यांना का पटवत नाही? कारण महामार्गावर पार्किंगसाठी जागा नाही. टप्प्याटप्प्याने वाहतुकीला परवानगी दिली असली, तरी रस्त्यावरील वाहनांमुळे लोकांची खूप गैरसोय होत आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे. या वाटाघाटीला वेळ लागेल.

या प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भुईया यांनी सुरू केली. हरियाणाच्या बाजूने सॉलिसिटर जनरल (एसजी) तुषार मेहता आणि पंजाबच्या बाजूने ॲडव्होकेट जनरल (एजी) गुरमिंदर सिंग यांनी शेतकऱ्यांशी बोलण्यासाठी समिती सदस्यांची नावे दिली.

# चाइल्ड पॉर्न पाहणे गुन्हा आहे का?

## सुप्रीम कोर्टात निर्णय राखीव

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

सुप्रीम कोर्टात सोमवारी (12 ऑगस्ट) चाइल्ड पोर्नोग्राफीशी संबंधित खटल्याची सुनावणी झाली. लाइव्ह लॉनुसार, केरळ उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते, ज्यात म्हटले होते की फोनवर मुलांशी संबंधित पॉर्न व्हिडिओ डाउनलोड करणे गुन्हा ठरणार नाही.

केरळ उच्च न्यायालयाने 13 सप्टेंबर 2023 रोजी एका खटल्याची सुनावणी करताना म्हटले होते की, जर एखादी व्यक्ती खाजगीरित्या अश्लील फोटो किंवा व्हिडिओ पाहत असेल तर तो गुन्हा नाही, परंतु जर तो इतरांना दाखवत असेल तर तो बेकायदेशीर असेल. खरं तर, त्याच आधारावर प्रथम केरळ उच्च न्यायालयात आणि नंतर मद्रास उच्च न्यायालयात एका आरोपीची निर्दोष मुक्तता झाल्यानंतर, एका स्वयंसेवी संस्थेने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. यावर सर्वोच्च न्यायालयाने आपला निर्णय तूर्त राखून ठेवला आहे.

# बिहारच्या मंदिरात चेंगराचेंगरी, 7 भाविकांचा मृत्यू

**वृत्तसंस्था**
**लखनौ**

बिहारच्या जेहानाबादमध्ये श्रावणी जत्रेदरम्यान श्रावणीच्या चौथ्या सोमवारी सिद्धेश्वरनाथ मंदिरात चेंगराचेंगरी झाली. यामध्ये 7 कावड धारकांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेत 12 हून अधिक जण जखमी झाले आहेत. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता प्रत्यक्षदर्शींनी व्यक्त केली आहे. तेथे बरेच लोक पडले होते.

ही घटना रविवारी रात्री उशिरा बारा वाजण्याच्या सुमारास घडली. लाठीचार्ज झाल्याचा आरोप मृतांच्या नातेवाईकांनी केला आहे. बराबर टेकडीवर भाविक एका बाजूने उतरत होते आणि दुसऱ्या बाजूने चढत होते. गोंधळ झाल्यावर बंदोबस्तात सहभागी असलेल्या प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी लाठीमार करण्यास सुरुवात केली. यामुळे चेंगराचेंगरी झाली, भाविक जीव वाचवण्यासाठी धावू लागले आणि चिरडले गेले.

मृताचे नातेवाईक कृष्ण कुमार यांनी सांगितले की, 'या घटनेत सुमारे 50 लोकांचा मृत्यू झाला आहे. दर्शनासाठी आलेले भाविक असे सांगत आहेत. रात्री 2 वाजल्यापासून लोक रुग्णालयात आहेत. प्रशासनाने योग्य ती व्यवस्था केलेली नाही.

# युक्रेनचे सैन्य रशियाच्या आत 30 KM घुसले

## 250 चौरस किमी क्षेत्रावर कब्जा केला, ध्वज फडकवला

**वृत्तसंस्था**
**मॉस्को**

युक्रेनचे सैन्य रशियाच्या ३० किमी आत घुसले आहे. CNN च्या रिपोर्टनुसार, फेब्रुवारी 2022 मध्ये युद्ध सुरू झाल्यानंतर ही पहिलीच वेळ आहे जेव्हा युक्रेनियन सैन्य रशियाच्या आत हल्ला करत आहे.

शुक्रवारपर्यंत, रशियन अधिकाऱ्यांनी युक्रेनियन सीमेवर किमान 250 चौरस किलोमीटरचा प्रदेश गमावला आहे. युक्रेनियन सैन्याचे पुढील लक्ष्य सुदजा हे रशियन शहर आहे. सोशल



मीडियावर अनेक व्हिडिओ व्हायरल झाले आहेत ज्यात युक्रेनचे सैनिक इमारतींवरील रशियाचा ध्वज काढून त्याजागी त्यांच्या देशाचा ध्वज लावत आहेत.

युक्रेनचा हल्ला रोखण्यासाठी रशिया शक्य ते सर्व प्रयत्न करत आहे. रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने सांगितले की, त्यांच्या सैन्याने टोलपिनो आणि ओब्श्री कोलोडझे या रशियन गावांमध्ये युक्रेनियन सैन्याशी लढा दिला. रशियाच्या कुर्स्क भागात सहाव्या दिवशीही युक्रेनचा हल्ला सुरूच आहे. रशियाने 8 ऑगस्ट रोजीच या भागात आणीबाणी लागू केली होती. अहवालानुसार, केवळ 24 तासांत युक्रेनियन सैन्याने कुर्स्क प्रदेशातील दोन मोठ्या तटबंदीच्या रेषा नष्ट केल्या, ज्याच्या निर्मितीसाठी रशियाला अडीच वर्षांपेक्षा जास्त काळ लागला आणि 170 दशलक्ष डॉलर्स (सुमारे 14 हजार कोटी) पेक्षा जास्त खर्च झाला.

# इराणी हॅकर्सनी ट्रम्प यांच्या निवडणूक प्रचारावर हल्ला केला

**वॉशिंग्टन**

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मोहिमेने (निवडणूक संघ) दावा केला आहे की त्यांचे अंतर्गत संभाषण, नियोजनाशी संबंधित माहिती आणि कागदपत्रे हॅक करण्यात आली आहेत. मोहिमेनुसार ही हॅकिंगची घटना इराणी हॅकर्सनी घडवून आणली आहे. अमेरिकन न्यूज वेबसाइट पॉलिटिकोने सोमवारी सांगितले की ट्रम्प यांच्या प्रचार कार्यक्रमाशी संबंधित वैयक्तिक कागदपत्रे ईमेलद्वारे पाठवण्यात आली आहेत.

# मॅच हरल्यामुळे शिक्षकाने खेळाडूंना लाथांनी मारले, थप्पड मारल्या

**वृत्तसंस्था**
**सेलम**

तामिळनाडूतील सेलममध्ये फुटबॉल सामना गमावल्यानंतर शारीरिक शिक्षणाच्या शिक्षकाने खेळाडूंना बेदम मारहाण केली. सामन्यानंतर मुलांना लाथा मारल्या, थप्पड मारल्या आणि केस ओढले. या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ 10 ऑगस्टपासून सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

अन्नामलाई असे खासगी शाळेतील या पीटी शिक्षिकेचे नाव आहे. व्हिडिओ समोर आल्यानंतर त्याला निलंबित करण्यात आले आहे. मात्र हा व्हिडीओ कधीचा आहे याची माहिती समोर आलेली नाही. स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडियाने (SFI) हा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला होता. सालेमचे मुख्य शिक्षण अधिकारी (सीईओ) एम. कबीर यांनी सांगितले की, शिक्षकाला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

अन्नामलाई मुलांना शिव्या देत होता. तो प्रत्येक खेळाडूकडे गेला, त्याने कुठे चूक केली ते सांगितले. यानंतर त्याने सगळ्यांना एक-एक करून थप्पड मारली. काहींचे केसही ओढले. यावेळी शाळेतील इतर मुले व शिक्षकही उपस्थित होते.

# भाचीच्या प्रेमात वेडी झाली मामी, पळून जाऊन केलं लग्न

**वृत्तसंस्था**
**लखनौ**

बिहारच्या गोपालगंजमध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. मामीने आपल्या भाचीवरच्या प्रेमापोटी पतीला सोडलं. त्यानंतर पळून जाऊन भाचीशी लग्न केल्याची घटना समोर आली आहे. दोघींनीही सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या कुटुंबीयांना लग्नाची माहिती दिली. तीन वर्षांपासून त्यांचे प्रेमसंबंध सुरू असल्याचं सांगण्यात येत आहे. कुचायकोट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बेलवा गावात ही घटना घडली आहे. बेलवा येथील रहिवासी असलेल्या मामी आणि भाचीने आपल्या सर्व नातेवाईकांचा विचार न करता दुर्गा भवानी मंदिरात लग्न केलं आहे. मंदिरात लग्नाच्या सर्व विधी पार पडल्या. यावेळी दोघींनी एकमेकांना हार घातला. गळ्यात मंगळसूत्र घातलं.

# महाराष्ट्रातील बंदरांचा विकास करून मासेमारी करणाऱ्यांसाठी कल्याणकारी योजना सुरु करण्यात याव्यात!

## खासदार रवींद्र वायकर यांची संसदेत मागणी

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

महाराष्ट्राला ७२० किलो मीटरचा समुद्र किनारा लाभला आहे. यात रत्नागिरी, दापोली, गुहागर, सिंधुदुर्ग अशा बंदरांचा समावेश आहे. या बंदरांचा विकास करण्यात यावा. मुंबईतील जुहू वर्सोवा कोळीवाडा तसेच अन्य ठिकाणी मासेमारी करणाऱ्यासाठी कल्याणकारी योजना सुरु करण्यात यावी. व ज्या प्रमाणे शेतकऱ्यांना विमा देण्यात येतो त्याप्रमाणे मच्छिमारीचा व्यवसाय करणाऱ्यांना ही विमा देण्यात यावा. अशी मागणी मुंबई उत्तर पश्चिमचे खासदार रवींद्र वायकर यांनी लोकसभेत फायनान्स बिलावर बोलताना



केली.

खा. वायकर पुढे म्हणाले की, मुंबईत दरदिवशी १ करोड पेक्षा जास्त लोक पब्लिक ट्रान्सपोर्टचा वापर करतात. त्यामुळे पब्लिक ट्रान्सपोर्ट आणि रेल्वेच्या पायाभूत सुविधा यांच्यात सुधारणा करण्यासाठी एम.यु.टी.पी ला जास्तीत जास्त निधी देण्यात यावा. यासाठी अर्थसंकल्पातून १ कोटी रुपयांचे विशेष अनुदान एम.यु.टी.पी ला देण्यात यावेत. मुंबई म्हाडा तसेच एस.आर.ए च्या माध्यमातून लोकाना परवडणारी घरे बांधण्यात येतात. परवडणारी घरे बांधण्यासाठी अर्थसंकल्पात १० लाख कोटी ची तरतूद करणात आली आहे. मुंबई ही देशाची आर्थिक व औद्योगिक राजधानी आहे. विविध राज्यातील जनता नोकरी निमित्त मुंबईत येते. मुंबईतील घरांच्या किमती जास्त असल्याने मुंबई घर घेणे या लोकांना जमत नाही. त्यामुळे नाईलाजाने त्यांना झोपड्यात राहवे लागते. आता झोपड्यांचे प्रमाणही वाढत आहे. बजेट मध्ये यासाठी १० लाख कोटीची तरतूद केली आहे त्यातील १ लाख कोटी मुंबई शहराच्या विकासासाठी देण्यात यावे.

मुंबईत कॅन्सर रुग्णावर उपचारासाठी टाटाचे एकमेव रुग्णालय आहे. राज्याच्या विविध भागातून कॅन्सर रुग्ण येथे उपचारासाठी येतात. त्यामुळे या रुग्णालयावर जास्त प्रमाणात भर पडतो. हा भार कमी करण्यासाठी आरे मधील जमिनीचे सर्वेक्षण करून सरकारी कॅन्सर रुग्णालय उभारण्यात यावे. अशाही मागण्या खा रवींद्र वायकर यांनी केल्या.

# राहुल गांधी सर्वात धोकादायक माणूस

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**



## कंगना रनौत संतापल्या

हिमाचल प्रदेशच्या मंडी येथील भाजप खासदार आणि अभिनेत्री कंगना रनौत यांनी काँग्रेस खासदार तसेच लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. कंगना रनौत यांनी ‘राहुल गांधी हे सर्वात धोकादायक व्यक्ती आहेत. ते विषारी आणि विध्वंसक आहेत.’, अशी टीका केली. राहुल गांधी यांनी हिंडनबर्ग अहवालानंतर केंद्र सरकारला कोंडीत पकडले. राहुल गांधी यांनी मोदी सरकारला अनेक प्रश्न विचारले. त्यांनी अदानी ग्रुप आणि सेबी यांच्यातील संगनमताचा आरोपही केला. याच मुद्द्यावरून कंगना रनौत या राहुल गांधी यांच्यावर संतापल्या.

भाजप खासदार कंगना रनौत यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर टीका केली. त्यांनी या पोस्टमध्ये असे लिहिले की, ‘राहुल गांधी हा सर्वात धोकादायक माणूस आहे. ते विषारी आणि विध्वंसक आहेत. त्यांचा अजेंडा आहे की जर ते पंतप्रधान होऊ शकत नाहीत तर ते या देशालाही नष्ट करू शकतात. आमच्या शेअर बाजाराला लक्ष्य करणाऱ्या हिंडनबर्गच्या अहवालाचे काल रात्री राहुल गांधी समर्थन करत होते. तो अहवाल खोटा ठरला.’

कंगना रनौत यांनी या पोस्टमध्ये पुढे लिहिले की, ‘ते या देशाची सुरक्षा आणि अर्थव्यवस्था अस्थिर करण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करत आहेत. राहुल गांधी तुम्ही आयुष्यभर विरोधी पक्षात बसायला तयार राहा आणि तुम्ही ज्याप्रकारे दु:ख सोसत आहात त्याप्रमाणे या देशाच्या जनतेचा अभिमान, विकास आणि राष्ट्रवादाला पाहून तुम्हाला वाईट वाटेल. या देशाची जनता तुम्हाला कधीही नेता बनवणार नाही.’

